**सातारा** जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी जिल्ह्याचे पर्यटन वाढवण्याच्या दृष्टीने सुरू केलेला कोयना दौलत डोंगरी महोत्सव यंदा २ एप्रिल ते ६ एप्रिलदरम्यान पाटण तालुक्यातील दौलतनगर मरळी येथे होणार आहे. राज्य पर्यटन विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात पर्यटकांसाठी पॅराग्लायडिंग, बोटींग, खाद्य महोत्सव, शस्त्र प्रदर्शन तसेच कृषी, पशुपक्षी व महिला बचत गटांचे प्रदर्शन, फनफेअर आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत नामांकित शाहिरांकडून पोवाडा सादरीकरण, भजनी मंडळ स्पर्धा, ब्रास बँड पथक वादन, लेझर शो, ड्रोन शो, लावणी महोत्सव तसेच मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे.

# पुण्यात हुंड्यासाठी सुनेचा छळ गरम पाणी ओतण्याचा प्रयत्न

**लोखंडे दाम्पत्यावर गुन्हा**

■ पुणे

**पुण्यात** लोहगाव परिसरात एका विवाहितेचा हुंड्यासाठी अमानुष छळ करण्यात आला असून, तिच्यावर गरम पाणी ओतण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी मुळशी तालुक्यातील संत तुकाराम साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अनिल लोखंडे आणि त्यांची पत्नी सुवर्णा लोखंडे यांच्याविरोधात लोहगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

संबंधित विवाहितेच्या लग्नावेळी तिच्या माहेरच्या मंडळींनी सुमारे २ कोटी रुपयांचा खर्च केला होता. यात दोन किलो चांदीसह एक आलिशान चारचाकी गाडी देण्यात आली. इतके देऊनही सासरच्या मंडळींचे समाधान झाले नाही, असा आरोप पीडितेकडून करण्यात आला आहे. लोखंडे कुटुंबाला शेअर मार्केटमध्ये मोठे आर्थिक नुकसान झाल्याने त्यांनी हे नुकसान भरून काढण्यासाठी सूनेकडून माहेरून पैसे आणण्याचा तगादा लावला. या मागणीसाठी त्यांनी पीडितेला सातत्याने मानसिक आणि शारीरिक छळ केला. पीडितेच्या डोक्याला पिस्तूल लावून धमकावल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. तसेच, तिच्या अंगावर गरम पाणी ओतण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक बाबही उघडकीस आली आहे.

# माटुंग्यात मरूबाईचा वार्षिकोत्सव सोन्याच्या पालखीतून मिरवणूक

■ मुंबई

**सुमारे** ४०० वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या माटुंग्याच्या श्री मरूबाई गावदेवीचा वार्षिक उत्सव आजपासून सुरू झाला असून, तो शुक्रवार ९ एप्रिलपर्यंत चालणार आहे. यंदा गुरुवार २ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता श्री मरूबाईची सुवर्ण पालखीतून मिरवणूक निघणार आहे, अशी माहिती मरूबाई गावदेवी मंदिर देवस्थानचे विश्वस्त अनिल गावंड यांनी दिली.

या श्री मरूबाईच्या वार्षिक उत्सवात दररोज सकाळी ५ वाजता अभिषेक आणि ६ वाजता आरती होणार आहे. आज मंगळवारी पहिल्या दिवशी श्री सूक्त-महाभिषेक करण्यात आला. उद्या बुधवार १ एप्रिल रोजी नवचंडी हवन, पूर्णाहुती आणि महाआरती, सामूहिक प्रार्थना, गुरुवार २ एप्रिल सायंकाळी मरूबाईची सुवर्ण पालखीतून मिरवणूक निघणार आहे. बुधवार ८ एप्रिलला कांची पीठ शंकराचार्य यांची भव्य स्वागत यात्रा व शुक्रवार ९ एप्रिल रोजी सायं. ८ ते १० वाजेपर्यंत शंकराचार्य श्री शंकर विजयेंद्र सरस्वती स्वामीभक्त यांच्या हस्ते महाकुंभाभिषेक आयोजित केला आहे. सर्व भाविकांनी या उत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिर देवस्थानतर्फे करण्यात आले आहे.

# भाजपाने जनतेला षंढ बनवले संजय राऊत यांचा घणाघात



■ मुंबई

**अमेरिकेत** राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या विरोधात सुरू असलेल्या आंदोलनाचा संदर्भ देत उबाठाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी भाजपा आणि पक्षाच्या शिर्षस्थ नेतृत्वावर घणाघाती टीका केली. गेल्या दहा - बारा वर्षांत भाजपाने जनतेला धर्माच्या अफुची गोळी देऊन षंढ बनवले, अशा शब्दांत राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव न घेता टीका केली.

अमेरिकेत ट्रम्प यांचा जो काही कारभार चालू आहे ती हुकूमशाही आहे. एका एका देशाविरूद्ध विनाकारण युध्द छेडण्याच्या ट्रम्प यांच्या आतताईपणाला तेथील जनता कंटाळली आहे. ट्रम्प लोकशाही धुळीस मिळवायच्या प्रयत्नात आहेत. तेथील जनता धाडसाने ट्रम्प यांच्या विरोधात लोकशाही टिकवण्यासाठी रस्त्यावर उतरली आहे. जवळपास ५० राज्ये, ३३० शहरांमध्ये सुमारे ८० लाख लोक ट्रम्प यांच्या विरोधात रस्त्यावर उतरले आहेत. भारतातही अशीच हुकूमशाही चालू आहे. भाजपाने धर्माच्या अफूची गोळी देऊन नागरिकांना बधिर केले आहे. आपल्या जनतेला जेव्हा जाग येईल तेव्हा अमेरिकेसारखेच भारतातही लोक भाजपाच्या नेतृत्वाच्या विरोधात रस्त्यावर उतरतील, असे राऊत म्हणाले.

# १ एप्रिलपासून नवीन नियम सॅलरी स्लिपमध्ये मोठे बदल

■ मुंबई

**१ एप्रिलपासून** नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात होत असून, त्यासोबतच आयकर कायदा आणि नवीन कामगार संहितेअंतर्गत अनेक महत्त्वाचे बदल लागू होणार आहेत. या बदलांचा थेट परिणाम कर्मचाऱ्यांच्या पगारावर, सॅलरी स्ट्रक्चरवर आणि कर गणनेवर होणार असून, टेक होम सॅलरी कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नवीन नियमांनुसार, आयकर, कामाचा कालावधी, बोनस आणि फुल अँड फायनल सेटलमेंट प्रक्रियेतही बदल होणार आहेत. त्यामुळे सॅलरी स्लिपमध्ये अनेक बदल दिसून येतील. सुरुवातीला हे बदल कर्मचाऱ्यांना तोट्याचे वाटू शकतात. पण दीर्घकालीन दृष्टीने ते फायदेशीर ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. आतापर्यंत अनेक कंपन्या मूळ पगार हा एकूण पगाराच्या २५ ते ४० टक्क्यांपर्यंतच ठेवत होत्या, ज्यामुळे पीएफ व ग्रॅच्युइटीवरील खर्च कमी राहायचा. नव्या नियमानुसार मूळ वेतन, महागाई भत्ता आणि रिटेनिंग अलाउन्स मिळून कॉस्ट टू कंपनीच्या किमान ५० टक्के असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# हिडकल धरणात बुडून दोन मृत्यू

**बेळगाव** - शालेय विद्यार्थ्यांना काल महावीर जयंतीची सुट्टी होती. त्यातच वाढत्या उन्हात थंडावा म्हणून हिडकल धरणात पोहण्यास गेलेल्या पाचपैकी दोन मुलांचा बुडून मृत्यू झाला. हुक्केरी तालुक्यातील गुडगनट्टी येथील ब्रह्म मंदिराजवळ सोमवारी सकाळी ही दुर्घटना घडली.

या घटनेतील मृत मुलांची नावे कृष्णा विठ्ठल खानापुरी (१४) व प्रज्वल मुत्तुप्पा गोकर (१४) अशी असून, ते हुक्केरी तालुक्यातील दादबानट्टी येथे राहत होते. हे दोघे सातवीत शिकत होते. या दोघांसोबत गेलेले मुत्तूराज बकुळ गस्ती (१४), सिद्धार्थ बसवराज पनगुद्दी (१४) व मंजुनाथ तम्माण्णा पात्रोट (१४) हे वेळीच पात्राबाहेर आल्याने वाचले आहेत. कृष्णा व प्रज्वल हे आरसी गुडगनट्टी येथील प्राथमिक कन्नड शाळेत सातवीत शिकत होते.

# महिला व बालकांच्या पोषणात मोठी सुधारणा करण्याचे लक्ष्य

**मुख्यमंत्री फडणवीसांची माहिती**

■ मुंबई

**राज्यातील** कुपोषणावर प्रभावी नियंत्रण मिळवून महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाऊंडेशन यांच्यात पाच वर्षांचा सामंजस्य करार करण्यात आला असून, या भागीदारीमुळे मातृ व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाऊंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्हज अँड पार्टनरशिप्स आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे.

# कुर्ला बेस्ट बस अपघात प्रकरणी चालकाला जामीन

**मुंबई** - कुर्ला पश्चिम येथे १० डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या भीषण बेस्ट बस अपघात प्रकरणातील आरोपी चालक संजय मोरे याला मुंबई उच्च न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला. जामीन अर्जावर सुनावणीदरम्यान न्या. आर. एम. जोशी यांनी निरीक्षण नोंदवत सांगितले की, प्रथमदर्शनी हे प्रकरण 'सदोष मनुष्यवध' नसून निष्काळजीपणामुळे मृत्यू असे दिसते. केवळ ३ दिवसांचे प्रशिक्षण देऊन चालकाच्या हाती इलेक्ट्रिक बस देणे ही गंभीर त्रुटी असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. आरोपी संजय मोरे याने यापूर्वी २० वर्षांहून अधिक काळ बस चालक म्हणून काम केले असून, त्यांना इलेक्ट्रिक बससाठी केवळ ३ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आल्याचा मुद्दा बचाव पक्षाने मांडला. अहवालानुसार अपघाताच्या वेळी त्यांनी मद्य किंवा अमली पदार्थांचे सेवन केले नव्हते.

# आसाममधील लाडक्या बहिणींना ३,००० रुपये! भाजपाचे आश्वासन

■ गुवाहाटी


**असम** विधानसभा निवडणुकांपूर्वी गुवाहाटी येथे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी भाजपाचा जाहीरनामा जाहीर केला. या जाहीरनाम्यात ३१ आश्वासनांचा समावेश करण्यात आला आहे. जाहीरनाम्यानुसार, 'ओरुनोडोई' योजनेअंतर्गत महिलांना मिळणारी मासिक मदत १,२५० रुपयांवरून वाढवून ३,००० रुपये करण्यात येईल. तसेच 'लखपती दीदी' योजनेअंतर्गत ४० लाख महिलांना २५,००० रुपयांची आर्थिक मदत देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. असम विधानसभा निवडणूक २०२६ पूर्वी मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गुवाहाटी येथे भाजपाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यावेळी केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल आणि राज्य भाजपा अध्यक्ष दिलीप सैकिया देखील उपस्थित होते. जाहीरनाम्यात ३१ महत्त्वाच्या आश्वासनांचा समावेश करण्यात आला आहे. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी सांगितले की, भाजपाचे उद्दिष्ट असमला सर्वात प्रगत राज्य बनवण्याचे आहे.

# तुळजापुरात अल्पवयीनांचा गैरप्रकार दर्शनाच्या नावाखाली भाविकांची लूट

■ धाराशिव

**धाराशिव** जिल्ह्यातील तुळजापूर येथील महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची अल्पवयीन मुलांकडून लूट होत असल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे.

स्वतःला पुजारी असल्याचे सांगून भाविकांना डायरेक्ट दर्शन करून देण्याचे आमिष दाखवत फसवणूक करत असल्याचेही उघड झाले



आहे. हा प्रकार भाविकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्याचे चित्रीकरण करण्यात आले. या व्हिडिओमध्ये लहान मुले विशेषतः वयोवृद्ध भाविकांना लक्ष्य करत दर्शनाला सोडतो, असे सांगून पैशांची देवाणघेवाण करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी अधिकृत प्रशासकीय व्यवस्था उपलब्ध असतानाही अशा प्रकारे अल्पवयीन मुलांकडून सर्रास लूट सुरू असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलीस व महसूल प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही भाविकांकडून करण्यात येत आहे.

# राज्यात २.५० लाख उष्माघाताचे रुग्ण नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन

■ मुंबई

**राज्यात** मार्च महिन्याच्या अखेरीस उष्मा प्रचंड वाढला आहे. यामुळे जनतेला उकाडा असह्य झाला आहे. आरोग्य विभागाच्या अहवालानुसार मार्चमध्ये २.५ लाखांहून अधिक रुग्णांनी शासकीय यंत्रणेत उपचार घेतल्याची नोंद झाली आहे. जळगाव, नाशिक, पालघर आणि रायगड येथे उष्माघाताचे रुग्ण आढळले आहेत. उष्माघाताने मृत्यूची नोंद नसली तरी या घटना पुढील धोक्याचा इशारा मानल्या जात आहेत. नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अहवालानुसार, राज्यभरात एकूण २५०८३२ रुग्ण नोंदवले गेले. यामध्ये प्रौढ रुग्णांचे प्रमाण सर्वाधिक २.२८ लाख असून, बालरुग्णांची संख्या २२ हजारांपेक्षा अधिक आहे. मुंबई महानगरपालिका क्षेत्रात एकट्याच ५१ हजारांहून अधिक रुग्णांची नोंद झाली.

# बिहारमध्ये नालंदा मंदिरात चेंगराचेंगरी

■ बिहार

**बिहारमधील** नालंदा जिल्हा येथे आज सकाळी शीतला माता मंदिरात भीषण चेंगराचेंगरी होऊन ९ भाविकांचा मृत्यू झाला असून, त्यात ८ महिलांचा समावेश आहे.

या मंदिरात दरवर्षी चैत्र महिन्याच्या शेवटच्या मंगळवारी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते. मात्र, गर्दी नियंत्रणासाठी पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसल्याचा आरोप प्रत्यक्षदर्शींनी केला आहे. दर्शनासाठी झालेल्या भाविकांत अचानक धक्काबुक्की सुरू झाली आणि काही क्षणातच चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. घटनेनंतर मंदिर आणि जत्रा तातडीने बंद करण्यात आली. राज्य सरकारने मृतांच्या कुटुंबियांना ६ लाख रुपये, तर केंद्र सरकारने २ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत. मृतांपैकी रीता देवी (५०), कांती देवी (५०), आशा देवी (६५), देवंती देवी (३५), अनुष्का देवी (४०) आणि रेखा देवी (४५) यांची ओळख पटली आहे.

**९ भाविक ठार**



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# आता विकासवादाची अंमलबजावणी हवी

२०२६ च्या मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत देशातील नक्षलवाद संपुष्टात आणण्याचा निर्धार केंद्र सरकारने व्यक्त केला होता. कालची ३१ मार्च तारीख हे नक्षलवादासाठी एका अर्थी डेडलाईन होती आणि हे वर्ष संपण्यापूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेमध्ये निवेदन करून नक्षलवाद संपुष्टात आणण्यामध्ये सरकारला कसे यश आले आहे याची माहिती दिली. ही गोष्ट खरी आहे की, ठरल्या वेळापत्रकानुसार नक्षलवादाला निरोप देण्यात सरकारला चांगल्यापैकी यश आलेले आहे. आज जवळपास सगळ्या जिल्ह्यातला नक्षलवाद संपुष्टात आला आहे. २०० पैकी केवळ दोन जिल्ह्यांमध्ये आता थोडाफार नक्षलवाद शिल्लक आहे. या सगळ्यात २०० जिल्ह्यांचा जो पट्टा होता त्याला रेड कॉरिडॉर म्हटले जात होते. या सगळ्या आदिवासी आणि वनवासी पट्ट्यामध्ये नक्षलवाद्यांनी आपापले बालेकिल्ले उभे करून तिथल्या आदिवासी जनतेला सतत आपल्या दहशतीखाली ठेवण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्यामध्ये सध्याच्या सरकारी यंत्रणेविरुद्ध संतोष निर्माण करण्यात नक्षलवादाला एकेकाळी यश आले होते. नक्षलवादाचे मूळ तत्त्व असे होते की तुम्हाला योग्य सोयी-सुविधा दिल्या जात नाहीत आणि सरकार ते करू शकत नाही. सरकारी यंत्रणा या भ्रष्ट आहेत आणि त्या वैधानिक मार्गाने न्याय मिळवून देऊ शकत नाही. त्यासाठी सशस्त्र क्रांती हाच एकमेव मार्ग आहे म्हणूनच नक्षलवादाने हिंसाचाराचा मार्ग स्वीकारून ठिकठिकाणी सरकारी यंत्रणांविरुद्ध मोठे लढे उभारले होते. ज्यामध्ये अनेक सरकारी अधिकारी मारले गेले. जवळपास हजारावर पोलिसांचे हौतात्म्य यामध्ये कारणी लागले आहे. त्यातला सर्वात धक्कादायक भाग असा होता की, शस्त्राच्या जोरावर आणि हिंसाचाराने दहशत माजवून केवळ आपले अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न नक्षलवादातून होत होता.

**लोकशाहीसाठी धोका**

कोणत्याही लोकशाही मार्गाने चर्चा करायची नाही, लोकशाही मार्गाने आंदोलन करायचे नाही किंवा संविधानाने दिलेल्या वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब न करता केवळ शस्त्र आणि हिंसेच्या माध्यमातूनच आपला लढा रेटत राहायचा अशा प्रकारचे एकतर्फी प्रकार नक्षलवादामध्ये गेल्या अनेक वर्षे सुरू होता. यामधून ना आदिवासींना न्याय मिळत होता ना त्या आदिवासी विभागाचा विकास होत होता. सातत्याने संघर्षमय असलेला हा सगळा पट्टा जाणीवपूर्वक अनेक सुविधांपासून वंचित ठेवण्याचाही प्रयत्न केला गेला होता. कारण ज्या ज्या वेळी तिथे सरकारी योजनांचा पाठपुरावा करण्याची वेळ यायची त्यावेळी नक्षलवाद हा प्रयत्न उधळून लावत होते. परिणामी त्या आदिवासी भागात विकासाची कामे पोहोचू शकली नाहीत. मग शाळा असेल, रुग्णालय असेल किंवा अगदी आजच्या आधुनिक काळातल्या मोबाईल टॉवर उभारण्यासारख्या सुविधा असतील याला देखील नक्षलवाद्यांनी विरोध केलेला पाहायला मिळाला होता. म्हणजे भारतीय लोकशाही व्यवस्थेमध्ये न्यायालयाचाही आधार घ्यायचा नाही किंवा संसद विधिमंडळ यासारख्या व्यासपीठांमधून त्या त्या आदिवासी भागाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करायचे नाहीत. केवळ आपल्या पद्धतीनेच या आदिवासी भागात वर्चस्व कायम ठेवत राहायचे हा प्रकार इतका टोकाला गेला होता की, हिंसाचाराचे हे सगळे बालेकिल्ले म्हणजे देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेला मिळालेले सर्वात मोठे आव्हान होते. या ठिकाणी सरकारी अधिकारी पोहोचू शकत नव्हते. पोलिसांना देखील येण्यापासून रोखले जात होते. त्यांच्या मार्गावर सुरुंग पेरून त्यांच्या गाड्याच्या गाड्या उडवून दिल्या जात होत्या. हा सगळा प्रकार भारतासारख्या लोकशाहीवादी देशांमध्ये अत्यंत धोकादायक ठरला होता. अर्थातच यामागे एक सुनियोजित षड्यंत्र असल्याचा वारंवार उल्लेख केला गेला होता. हा केवळ स्थानिक आदिवासींच्या स्वयंप्रेरणेतून निर्माण झालेला लढा नव्हता. प्रामुख्याने वेगवेगळी विचारधारा जोपासत आणि बाहेरच्या शक्तींची मदत घेत हा नक्षलवाद फोफावल्याचे पाहायला मिळालेले होते. म्हणूनच त्याला माओवादी किंवा नक्षलवादी असे म्हटले जात होते.

**आतापर्यंतचे मोठे यश**

सातत्याने होणारा हा हिंसाचार आणि त्यात जाणारे निष्पाप लोकांचे बळी आणि आदिवासींच्या विकासावर येणारी गदा या सगळ्या गोष्टींचा विचार करून सरकारने अत्यंत कठोरपणे हा नक्षलवाद मोडून काढण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रामध्ये गडचिरोली, चंद्रपूर या भागामध्ये नक्षलवादाचे अनेक वर्षे थैमान चालवत होते. परंतु या ठिकाणी सुद्धा केंद्र सरकारच्या मदतीने सी-१६ अशा प्रकारचा एक नवीन पोलीस विभाग तयार करण्यात आला आणि अतिशय अत्याधुनिक प्रशिक्षण घेतलेले आणि आधुनिक शस्त्र असलेले हे पोलीस दल नक्षलवादाविरुद्ध जोरदार मोहीम आखत होते. या सी-६ मोहिमेने खूप मोठे यश मिळवून दिले आणि चंद्रपूर गडचिरोली भाग नक्षलमुक्त झालेला आहे. भारताच्या एकूण अंतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण भाग ठरलेल्या नक्षलवादावर मिळवलेला हा विजय निश्चितच देशाच्या आणि लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो. परंतु केवळ हा विजय मिळाला म्हणजे आता नक्षलवाद संपुष्टात आला असे समजून चालणार नाही. नक्षलवाद जरी संपुष्टात आला असला तरी आता त्या ठिकाणी विकासवाद तितक्याच वेगाने राबवण्याची आवश्यकता आहे. कारण गेली अनेक दशके जे विभाग मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवले गेले होते त्यांच्यासाठी सरकारने वेगवेगळ्या उपाययोजना तिथे सुरू केलेल्या आहेत. आता नक्षलवाद संपुष्टात आला असे म्हणून त्यात विभागांकडे पुन्हा दुर्लक्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नक्षलवादाची जागा आता खऱ्या अर्थाने विकासवादाने घेतली पाहिजे आणि विकासवादातून मागे राहिलेल्या आदिवासी भागाला अधिकाधिक वेगाने सर्वप्रथम साधनसुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. ज्याप्रमाणे देशाचा दहशतवाद संपुष्टात आणला जातो आहे त्याच पद्धतीने आता नक्षलवादाची अखेर झालेली आहे. लोकशाहीवादी देशांमध्ये भारतीय संविधानाने दिलेल्या सर्व वैधानिक किंवा कायदेशीर मार्गांचा अवलंब करून प्रत्येक समस्या सोडवण्यावर भर दिला गेला पाहिजे. लोकशाही व्यवस्थेमध्ये हिंसाचार किंवा दहशतीला अजिबात स्थान नाही हे नक्षलवादाला संपुष्टात आणण्यातून सिद्ध होते.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

आयुष्यात कितीही अडचणी असल्या तरी
पर्याय एकच संयम आणि शांतता.

## पंचांग

बुधवार ०१ एप्रिल २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर



* चैत्र शुक्ल चतुर्दशी
नक्षत्र - उत्तरा फाल्गुनी

रवी उदय- ०६-३४,
रवी अस्त- १८-५१

जन्मराशी :-
००-०१ ते २४-००- कन्या

**श्री हनुमान जयंतीचा उपवास; ज्योतिर्लिंग यात्रा-कोल्हापूर, पौर्णिमा प्रारंभ सकाळी ७.०६**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### बुंदीचे लाडू



★**साहित्य:** २ कप बेसन, १/२ टीस्पून पिवळा किंवा केशरी फूड कलर, २ चिमूट मीठ तळण्यासाठी तूप किंवा तेल, ५०० ग्रॅम साखर, ५०० मिली पाणी, २-३ वेलची, चिमूटभर केशर, अर्धा टी. स्पून लिंबाचा रस

★**कृती:**
प्रथम बेसन चाळून घ्या. त्यात मीठ, केशरी रंग घालून थोडे थोडे पाणी व तेल घालून गाठी मोडेपर्यंत फेटून घ्यावे. ५-६ मिनिटे नीट चांगले फेटून घ्या. एक वाटी पीठाला अंदाजे अर्धी वाटी पाणी लागते.

आता गॅसवर कढईत तेल किंवा तूप गरम करून ठेवा. मग बुंदीचा झारा कढईच्या वर ७-८ इंच धरून त्यावर चमच्याने बॅटर घालून झाऱ्यावर हाताने किंवा एखाद्या लाटण्या वगैरेने आपटून बूंदी पाडावी. उंचावरून बुंदी पाडवल्याने ती गोल व बारीक पडते. बुंदी तळल्यावर काढून घेऊन परत झाऱ्यावर बेसन घालण्यापूर्वी झारा धुवून घ्यावा.

मंद आचेवर बुंदी कुरकुरीत तळा. बुंदी एका ताटात काढा. दरम्यान साखरेत पाणी घालून एक तारीचा पाक करा. त्यात वेलची, केशर, ड्रायफ्रूट्स बुंदी घाला. १ तास मुरत ठेवा. एका तासानंतर मुरल्यावर लाडू वळा. बुंदीचे लाडू तयार.



## क्रीडा

# कॉनोलीची कमाल! पंजाब किंग्सची विजयी सलामी

## गुजरात टायटन्सच्या गिल-बटलरची खेळी निष्फळ

**आयपीएल २०२६ मधील चौथ्या सामन्यात पंजाब किंग्सने गुजरात टायटन्सवर थरारक विजय मिळवत हंगामाची दमदार सुरुवात केली. न्यू चंदीगड येथील महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या या लढतीत पंजाबने १६३ धावांचे लक्ष्य १९.१ षटकांत ७ गडी राखून १६५ धावा केल्या. या विजयाचा शिल्पकार ठरला पदार्पण करणारा ऑस्ट्रेलियन फलंदाज कूपर कॉनोली, ज्याने अवघ्या ३४ चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावत संघाला संकटातून बाहेर काढले.**



कुपर कॉनोलीच्या ४४ चेंडूंत नाबाद ७२ धावा

■ चंदीगड

**सामन्याची** सुरुवात गुजरात टायटन्सच्या फलंदाजीने झाली. कर्णधार शुभमन गिल आणि साई सुदर्शन यांनी संघाला चांगली सुरुवात करून दिली. गिलने ३९ धावांची खेळी करत डाव सावरला, तर जोस बटलरने ३८ धावांचे योगदान दिले. ग्लेन फिलिप्सने २५ धावा करत शेवटच्या षटकांत गती देण्याचा प्रयत्न केला. मात्र, पंजाबच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत गुजरातला २० षटकांत ६ गडी बाद १६२ धावांवर रोखले. विजयकुमार वैशाखने ३ बळी घेत उत्कृष्ट कामगिरी केली, तर युझवेंद्र चहलने २ बळी घेत त्याला चांगली साथ दिली.

१६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाबची सुरुवात सावध होती. प्रभसिमरन सिंगने ३७ धावा करत संघाला चांगली गती दिली, तर त्याला कूपर कॉनोलीची साथ लाभली. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी महत्त्वपूर्ण भागीदारी करत संघाला मजबूत स्थितीत आणले. मात्र, मधल्या षटकांत प्रसिद्ध कृष्णाने अवघ्या दोन षटकांत तीन बळी घेत सामना रंगतदार केला. पंजाबचा डाव एका टप्प्यावर १०९/२ वरून ११८/६ असा ढासळला आणि सामना गुजरातच्या बाजूने झुकला. या सामन्यात पंजाबच्या गोलंदाजीसह फलंदाजीनेही प्रभावी कामगिरी केली. विजयकुमार वैशाख आणि युझवेंद्र चहल यांच्या अचूक गोलंदाजीने गुजरातला मोठी धावसंख्या उभारता आली नाही, तर कॉनोलीच्या अर्धशतकामुळे पंजाबला विजय मिळवता आला.

## वाशीत ६० व्या राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेचा थरार रंगणार

■ नवी मुंबई

**नवी** मुंबईत ६० वी वरिष्ठ राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनच्यावतीने १३ ते १६ एप्रिल २०२६ दरम्यान वाशी येथील क्रीडांगणात ही स्पर्धा रंगणार आहे. महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व ठाणे डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत पुरुष एकेरी, महिला एकेरी, ५० वर्षांवरील पुरुष व महिला एकेरी तसेच पुरुष व महिला सांघिक गट अशा विविध प्रकारांमध्ये सामने खेळवले जाणार आहेत.

## विक्रोळीत पुरुष-महिला संघांचा कबड्डी संग्राम

■ मुंबई

**विक्रोळी** परिसरात आजपासून कबड्डीप्रेमींसाठी क्रीडा महोत्सवाची सुरुवात झाली. टागोर नगर मित्र मंडळाच्या वतीने आयोजित पुरुष व महिला जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेला प्रारंभ झाला. विक्रोळी पूर्व येथील साई मंदिराशेजारील मैदानात मॅटवर सायंकाळी ६ ते १० या वेळेत सामने रंगले.

स्पर्धेची सुरुवात पुरुष गटातील यंग स्टार विरुद्ध शूर जवान, तर महिला गटातील सत्यम विरुद्ध एम.आय.ई.एस. या सामन्यांनी होणार आहे. या स्पर्धेत एकूण १९ पुरुष संघ आणि ९ महिला संघ सहभागी झाले. यामध्ये पारितोषिकांची लयलूट असलेल्या या स्पर्धेत विजेत्या पुरुष संघाला रोख १५ हजार रुपये व चषक, तर उपविजेत्या संघाला १० हजार रुपये व चषक देण्यात येणार आहे. महिला गटात विजेत्या संघाला ८ हजार रुपये व चषक, तर उपविजेत्या संघाला ५ हजार रुपये व चषक प्रदान करण्यात येणार आहे.

याशिवाय स्पर्धेतील सर्वोत्तम पुरुष व महिला खेळाडूंना प्रत्येकी १ हजार रुपये व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. दररोज उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंनाही प्रत्येकी ५०० रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे. तसेच या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंचालाही १ हजार रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

## महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन अध्यक्षपदी राहुल शेवाळे बिनविरोध

■ मुंबई

**शिंदेसेनेचे** माजी खासदार राहुल शेवाळे यांची महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया (बीएफआय) च्या निरीक्षकांच्या उपस्थितीत मुंबईत पार पडलेल्या निवडणुकीत हा निर्णय झाला.

दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक येथे १ मार्च रोजी पार पडलेल्या या निवडणुकीत राज्यभरातील २५ जिल्हास्तरीय संघटनांमधील



एकूण ५० प्रतिनिधींनी एकमताने १३ पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड केली. सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता झाल्यानंतर बीएफआयने या नव्या कार्यकारिणीला अधिकृत मान्यता दिली आहे.

नव्या कार्यकारिणीत वरिष्ठ उपाध्यक्षपदी रणजीत सावरकर, सचिवपदी डॉ. राकेश तिवारी, कोषाध्यक्षपदी मिलन वैद्य, तर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अनिल त्रिवेदी यांची निवड करण्यात आली आहे. याशिवाय अर्जुन पुरस्कार विजेते गोपाल देवांग आणि ऑलिम्पियन मनोज पिंगळे यांचाही कार्यकारिणीत समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनची मागील कार्यकारिणी २०२२ मध्ये संपुष्टात आली होती. त्यानंतर विविध कारणांमुळे २०२५पर्यंत निवडणूक होऊ शकली नव्हती. नोव्हेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेली निवडणूक कायदेशीर बाबींची पूर्तता न झाल्याने बीएफआयने अवैध ठरवली होती. बीएफआयचे निरीक्षक नरेंद्रकुमार निरवाणा यांच्या उपस्थितीत झालेल्या या निवडणुकीत १३ पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाली. उर्वरित दोन पदांसाठी (एक पुरुष आणि एक महिला खेळाडू प्रतिनिधी) लवकरच निवडणूक घेतली जाणार आहे.

## लखनौचा आज दिल्ली विरुद्ध पहिला सामना

■ लखनौ

**आयपीएल** २०२६ हंगामाच्या पाचव्या दिवशी लखनौ सुपर जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन बलाढ्य संघांचा सामना रंगणार आहे. लखनौ येथील एकाना क्रिकेट मैदानावर सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास हा सामना खेळवला जाणार आहे.

**लखनौ** संघासाठी यावर्षीचा हंगाम अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. संघाचा कर्णधार ऋषभ पंत याच्यावर विशेष लक्ष असणार आहे. गेल्या हंगामात तो ना फलंदाज म्हणून प्रभाव टाकू शकला, ना कर्णधार म्हणून संघाला यश मिळवून देऊ शकला. त्यातच अनेक प्रमुख खेळाडू दुखापतीमुळे बाहेर असल्याने संघाचे संतुलन बिघडले होते. त्यामुळे यावर्षी पंतसाठी ही स्वतःला सिद्ध करण्याची मोठी संधी आहे. लखनौचा संघ यावेळी अधिक मजबूत आहे. अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी आणि दक्षिण आफ्रिकेचा एनरिक नॉर्टजे यांचा समावेश झाल्याने गोलंदाजीला चांगली धार आली आहे. गेल्या काही काळापासून दुखापतींनी त्रस्त असलेला मयंक यादव आता पूर्णपणे तंदुरुस्त झाला असून, त्याच्याकडून वेगवान आणि प्रभावी गोलंदाजीची अपेक्षा आहे. मोहसिन खान देखील पुनरागमन करत आहे, तर तरुण खेळाडू प्रिन्स यादवने सराव सत्रात चांगली छाप पाडली. फिरकी गोलंदाज दिग्वेश राठीही संघासाठी महत्त्वाचा ठरू शकतो.



## फखर जमानवर २ सामन्यांची बंदी

**कराची** - पाकिस्तान सुपर लीगमध्ये (पीएसएल) 'बॉल टॅम्परिंग' प्रकरणामुळे पाकिस्तान क्रिकेटमध्ये खळबळ उडाली. या प्रकरणात पाकिस्तानचा सलामीवीर फखर जमान दोषी आढळल्याने त्याच्यावर दोन सामन्यांची बंदी घातली आहे.

पीएसएलने दिलेल्या माहितीनुसार, लाहोर कलंदर्स आणि कराची किंग्स यांच्यात झालेल्या सामन्यात आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी फखर जमानला लेव्हल-३ गुन्ह्यात दोषी ठरवण्यात आले. या प्रकरणाची सुनावणी करताना रोशन महानामा यांनी सर्व पुरावे तपासून हा निर्णय दिला.

## कंटाळा आला तरच निवृत्ती! शमीचा समितीला इशारा



■ नवी दिल्ली

**भारतीय** वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याने अलीकडेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीबाबत आपली भूमिका स्पष्ट करत निवड समितीला ठाम संदेश दिला. सध्या निवृत्तीचा कोणताही विचार नसून, ज्या दिवशी मला खेळाचा कंटाळा येईल, त्या दिवशीच मी निवृत्ती घेईन, असे स्पष्टपणे सांगितले.

३५ वर्षीय शमीने २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारताच्या उत्कृष्ट कामगिरीत महत्त्वाची भूमिका बजावली होती. भारत अंतिम फेरीत पोहोचला होता. मात्र ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला. त्यानंतर २०२५ मध्ये चॅम्पियन्स करंडक जिंकणाऱ्या भारतीय संघातही तो सहभागी होता. मात्र, त्यानंतर त्याला भारतीय संघात संधी मिळालेली नाही. अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीने शमीकडे दुर्लक्ष केल्याची चर्चा आहे. पूर्णपणे तंदुरुस्त असूनही दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकांसह टी-२० विश्वचषकासाठीही त्याची निवड झाली नाही. २०२५-२६ च्या देशांतर्गत हंगामात बंगालकडून खेळताना शमीने तब्बल ६७ बळी घेतले होते. एवढी दमदार कामगिरी करूनही त्याला भारतीय संघात स्थान मिळाले नाही. यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

एका मुलाखतीत बोलताना शमी म्हणाला, जेव्हा मी थकेन किंवा मला खेळाचा कंटाळा येईल तेव्हाच मी निवृत्ती घेईन. सध्या मी खेळाचा आनंद घेत आहे. माझी कामगिरीही चांगली आहे. त्यामुळे निवृत्तीचा विचार करण्याचे काहीच कारण नाही. खेळाडूसाठी मानसिक स्थिती महत्त्वाची असते. जर तुम्ही आधीच निवृत्तीचा विचार करू लागलात, तर याचा अर्थ तुम्ही आतून थकलेले आहात. पण मी अजूनही उत्साही आहे.

## संजय गांधी साकारताना...



**मराठी** चित्रपटसृष्टी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेता राहुल भट सध्या त्याच्या आगामी 'समर ऑफ ७६' या राजकीय चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात तो संजय गांधी यांची आव्हानात्मक भूमिका साकारणार असून, या भूमिकेसाठी त्याने केलेली तयारी आणि त्याच्या बालपणीच्या आठवणी त्याने नुकत्याच एका मुलाखतीत शेअर केल्या.

राहुलच्या मते, संजय गांधी हे अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि धाडसी व्यक्तिमत्त्व होते. तरुण वयात अफाट सत्ता आणि आत्मविश्वास बाळगणारे राजकारणी म्हणून त्यांची ओळख होती. मला त्यांच्या राजकीय प्रतिमेपेक्षा त्यांच्यातील माणूस आणि त्या काळच्या विलक्षण परिस्थितीत वावरणारा एक तरुण समजून घेण्यात जास्त रस होता, असे राहुलने सांगितले. या भूमिकेसाठी त्याने जुने अर्काइव्हल फुटेज, छायाचित्रे आणि मुलाखतींचा सखोल अभ्यास केला आहे. या भूमिकेशी राहुलचे एक वैयक्तिक नातेही जोडलेले आहे. राहुलने सांगितले की, माझे काका ए. के. भट यांचे त्यांच्याशी जवळचे संबंध होते, त्यामुळे त्या काळात मी त्यांना पाहिले होते. मी खूप लहान असताना त्यांच्या मांडीवर बसलो होतो आणि त्यांनी मला बिस्किटे दिली होती, अशी एक आठवणही राहुलने सांगितली. मला नेहमीच मानवी स्वभावाच्या गुंतागुंतीच्या आणि गडद छटा शोधणाऱ्या भूमिका करायला आवडतात, असे तो सांगतो.



## खलनायकाच्या भूमिकेत विनीत

मॅडॉक फिल्म्सच्या हॉरर-कॉमेडी विश्वाचा विस्तार आता अधिक थरारक वळण घेणार असल्याचे संकेत मिळत आहेत. या मालिकेतील सहावा चित्रपट 'शक्ती शालिनी' मध्ये विनीत कुमार सिंग खलनायकाच्या भूमिकेत दिसणार असल्याचे वृत्त आहे. आदित्य सरपोतदार यांच्या दिग्दर्शनाखाली आकाराला येणाऱ्या या प्रकल्पात अनित पड्डा मुख्य भूमिकेत असून, विनीतचे पात्र अत्यंत 'डार्क' आणि आव्हानात्मक असेल असे समजते. विनीत सध्या त्याच्या 'छावा' आणि 'जात' सारख्या प्रकल्पांमुळे चर्चेत आहे. 'शक्ती शालिनी'साठी त्याने मुंबईतील चित्रीकरणाला सुरुवात केली असून, त्यानंतर तो 'दहाड'च्या दुसऱ्या पर्वाचे काम पूर्ण करेल. मे महिन्यात या चित्रपटाचे पुढील चित्रीकरण मध्य प्रदेशात नियोजित आहे. या विश्वात प्रथमच इतकी गंभीर आणि नकारात्मक भूमिका विनीत साकारणार असल्याने प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. अनित पड्डाकडे या चित्रपटाची धुरा आहे. तसेच या चित्रपटात विशाल जेठवा देखील महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार असून, 'सलाम वेंकी'नंतर ही जोडी पुन्हा एकदा पडद्यावर एकत्र येणार आहे.

या चित्रपटाचे प्रदर्शन आधी २४ डिसेंबर २०२६ रोजी निश्चित करण्यात आले होते. मात्र, आता पुढील वर्षीच्या सुरुवातीला हा चित्रपट प्रदर्शित करण्याचा विचार करत आहेत.

## राजपालला सावध केले होते : अक्षय

**राजपाल** यादव यांच्या ९ कोटी रुपयांच्या धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणामुळे चित्रपटसृष्टीत मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणावर अक्षय कुमारने नुकतीच आपली प्रतिक्रिया व्यक्त केली असून, चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रातील जोखमीबाबत राजपालला आधीच सावध केले होते, असे त्याने म्हटले आहे. 'भूत बंगला' या आगामी चित्रपटाच्या प्रसिद्धीदरम्यान अक्षयने या विषयावर भाष्य केले. अक्षयने नमूद केले की, त्याने राजपाल यादवला यापूर्वीच चित्रपट निर्मितीच्या व्यवसायात न पडण्याचा सल्ला दिला होता. जोपर्यंत या क्षेत्रातील तांत्रिक आणि आर्थिक गणिते पूर्णपणे समजत नाहीत, तोपर्यंत स्वतःचे भांडवल गुंतवणे धोक्याचे ठरू शकते, असे अक्षयचे मत आहे. कलाकारांनी आपल्या अभिनय कौशल्यावरच पूर्ण लक्ष केंद्रित करावे, असा सुहृद सल्ला त्याने राजपालला दिला होता. या प्रसंगी अक्षयने ज्येष्ठ अभिनेते असरानी यांनी दिलेल्या मोलाच्या सल्ल्याची आठवण करून दिली. असरानी यांनी त्यांच्या कारकिर्दीत स्वतःचा पैसा लावून चित्रपट निर्मिती केली होती, परंतु त्यात त्यांना मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागले होते. स्वतःच्या अनुभवातून त्यांनी अक्षयला बजावले होते की, कधीही स्वतःचे खासगी भांडवल चित्रपट निर्मितीसाठी वापरू नकोस. याच अनुभवाचा आधार घेत अक्षयने राजपालच्या प्रकरणावर आपली भूमिका स्पष्ट केली.



## सर्वांत हॉटेस्ट भूमिकेत कृती



**होमी** अदजानिया दिग्दर्शित 'कॉकटेल २' या आगामी चित्रपटामुळे कृती सेनॉन सध्या कमालीची चर्चेत आहे. या चित्रपटात तिने साकारलेली भूमिका तिच्या कारकिर्दीतील आजवरची सर्वात हॉटेस्ट भूमिका असल्याचे तिने म्हटले आहे. शाहिद कपूर आणि रश्मिका मंदाना यांच्यासह कृती या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे.

एका मुलाखतीदरम्यान कृतीने सांगितले की, 'कॉकटेल २' मधील तिचा लूक तिच्या आधीच्या सर्व भूमिकांपेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. दिग्दर्शक होमी अदजानिया यांनी तिच्या व्यक्तिमत्त्वातील एक कूल बाजू पडद्यावर आणली आहे, ज्याची तिला स्वतःलाही कल्पना नव्हती. होमी यांची सौंदर्याची आणि दृश्यांची जाण विलक्षण असून, त्यांनी कृतीला एका ग्लॅम रस अवतारात सादर केले आहे.

२०१२ मध्ये आलेल्या 'कॉकटेल' चित्रपटाशी या दुसऱ्या भागाचा थेट संबंध नसल्याचे कृतीने स्पष्ट केले आहे. मात्र, दोन्ही चित्रपटांचे 'वाइब' किंवा वातावरण सारखेच असेल. पहिल्या भागाप्रमाणेच यातही दोन मुली आणि एक मुलगा अशी कथा गुंफण्यात आली आहे. भावना, मैत्री, नाट्य, उत्तम संगीत आणि चित्तवेधक लोकेशन्स यांचे मिश्रण या चित्रपटात पाहायला मिळेल, असेही तिने नमूद केले. हा चित्रपट १९ जून २०२६ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.



## सलमान झळकणार मोठ्या ॲक्शन ड्रामामध्ये

**बॉलीवूडचा** भाईजान सलमान खान आता राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक वम्शी पैदीपल्ली आणि प्रसिद्ध निर्माते दिल राजू यांच्यासोबत एका मोठ्या ॲक्शन ड्रामासाठी सज्ज झाला आहे. या अद्याप नाव न ठरलेल्या चित्रपटाचे चित्रीकरण लवकरच या चित्रपटाचे सुरू होणार असून, २०२७ च्या ईदच्या मुहूर्तावर हा चित्रपट प्रदर्शित करण्याचे नियोजन निर्माते करत आहेत.

हा चित्रपट सलमान खानच्या चाहत्यांसाठी एक मोठी मेजवानी ठरणार आहे. भारताच्या विविध भागांत या चित्रपटाचे चित्रीकरण केले जाणार असून, यात मोठ्या प्रमाणावर 'व्हिज्युअल इफेक्ट्स'चा (व्हीएफएक्स) वापर करण्यात येणार आहे. या त्रिकुटाच्या एकत्र येण्यामुळे सिनेसृष्टीत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. सध्या सलमान खान त्याच्या 'मातृभूमी: मे वॉर रेस्ट इन पीस' च्या प्रसिद्धीमध्ये व्यग्र आहे. हा चित्रपट १४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

## टायगरला वाटते विमानप्रवासाची भीती

**बॉलीवूडचा** 'ॲक्शन स्टार' टायगर श्रॉफ पडद्यावर कितीही धाडसी स्टंट करत असला, तरी खऱ्या आयुष्यात तो एका वेगळ्याच भीतीचा सामना करत आहे. 'एअरोफोबिया' म्हणजेच विमान प्रवासाची भीती वाटत असल्याचे टायगरने मान्य केले असून, या समस्येतून बाहेर पडण्यासाठी तो आता मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेण्याचा विचार करत आहे.

काही वर्षांपूर्वी एका विमान प्रवासादरम्यान टायगरला प्रचंड टर्ब्युलन्सचा अनुभव आला होता. तेव्हापासून त्याला विमान प्रवासाची प्रचंड भीती वाटू लागली आहे. विमान प्रवासावर माझे नियंत्रण नसते, ही भावना मला अस्वस्थ करते. आता तर विमान प्रवासाच्या दोन-तीन दिवस आधीपासूनच मला अनामिक भीती आणि दडपण जाणवू लागते, असे टायगरने एका मुलाखतीत स्पष्ट केले.



विमान हे प्रवासाचे सर्वात सुरक्षित साधन आहे आणि टर्ब्युलन्स म्हणजे केवळ रस्त्यावरील खडबडीत प्रवासासारखे असते, हे तांत्रिक सत्य टायगरला ठाऊक आहे. अनेक वैमानिकांनीही त्याला हीच समजूत घातली आहे. मात्र, जेव्हा प्रत्यक्ष विमानात असतो, तेव्हा माझे मन हे तर्क मानायला तयार नसते. मला माझ्या शरीराच्या प्रत्येक हालचालीवर नियंत्रण ठेवायला आवडते, पण विमानात ते शक्य नसल्याने माझी अस्वस्थता वाढते, अशी कबुली त्याने दिली आहे.

या भीतीमुळे टायगरला कधीकधी नैराश्यही येते. केवळ विमान प्रवासच नाही, तर दैनंदिन कामाचे नियोजन करतानाही तो अनेकदा गोंधळलेला असतो. मी खूप विचार करतो, त्यामुळे दिवसाचे वेळापत्रक ठरवतानाही मला कठीण जाते, असे त्याने नमूद केले. 'बागी ४' मध्ये शेवटचा दिसलेला टायगर आता या फोबियावर मात करून पुन्हा आत्मविश्वासाने प्रवासासाठी सज्ज होण्याच्या तयारीत आहे.

## मुलीच्या नातेवाईकांकडून मारहाण २३ वर्षीय तरुणाची आत्महत्या

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील मांजरसुंबा परिसरात एका २३ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रेमसंबंधाच्या वादातून मुलीच्या नातेवाईकांकडून झालेल्या मारहाणीमुळे आणि मानसिक छळामुळे या तरुणाने टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

ज्ञानेश्वर तुकाराम कोकाटे मांजरसुंबा येथील रहिवासी असून, नेकनूरजवळील एका गावातील तरुणीसोबत त्याचे प्रेमसंबंध होते. या संबंधांची माहिती मुलीच्या कुटुंबियांना मिळाल्यानंतर त्यांनी संतापाच्या भरात ज्ञानेश्वरला गावात बोलावून घेतले. त्यानंतर चार जणांनी मिळून त्याची दुचाकी आणि मोबाईल काढून घेत त्याला बेदम मारहाण केली. त्याच्यावर चोरीचा खोटा आरोप करत गावात सार्वजनिक बदनामी केल्याचाही आरोप आहे. या घटनेमुळे ज्ञानेश्वर गंभीर मानसिक तणावाखाली गेला होता. आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत ज्ञानेश्वरने लिहिले की, मला खूप मारहाण केली, गावात चोरटा म्हणून बदनाम केले आणि जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या.

या प्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात वसंत उंदरे, सचिन उंदरे, अशोक उंदरे आणि प्रेम उंदरे यांच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## येवल्यात विमानाच्या घिरट्या सुरत विमानतळावर सुरक्षित लँडिंग



■ नाशिक

**येवला** तालुक्याच्या पूर्व भागात एका विमानाने अतिशय कमी उंचीवर घिरट्या घातल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. दिल्लीहून शिर्डीकडे येणारे हे विमान खराब हवामानामुळे भरकटल्याने हा प्रकार घडला. मात्र, अखेर या विमानाचे सुरत विमानतळावर सुरक्षित लँडिंग करण्यात आल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

दिल्लीहून शिर्डीकडे येणारे हे विमान काल रात्री ८ वाजताच्या सुमारास शिर्डी विमानतळावर उतरवण्यात येणार होते. मात्र, शिर्डी परिसरात विजांचा कडकडाट, वादळी वारे आणि पावसामुळे निर्माण झालेल्या प्रतिकूल हवामानामुळे एअर ट्रॅफिक कंट्रोलने (एटीसी) लँडिंगसाठी परवानगी नाकारली. यामुळे विमान काही काळ हवेतच 'होल्ड'वर ठेवण्यात आले. दरम्यान, ते येवला तालुक्याच्या हवाई हद्दीत आले आणि भारम, गारखेडा, आडसुरेगाव व पिंपळखुटे बुद्रुक या गावांच्या परिसरात ६ ते ८ वेळा कमी उंचीवर गोलाकार घिरट्या घालत राहिले.

रात्रीच्या वेळी विमानाचा मोठा आवाज आणि कमी उंचीमुळे नागरिक घाबरले. काही काळ युद्धजन्य परिस्थिती किंवा अपघाताची शक्यता असल्याच्या अफवा सोशल मीडियावर पसरल्या. ग्रामस्थ घाबरून घराबाहेर पडले होते. नागरिकांनी आपत्कालीन यंत्रणांना कळवताच पोलीस व महसूल प्रशासन सतर्क झाले.

## जालना विधानसभा वाद संपला खोतकरांना कोर्टाचा दिलासा

■ जालना

**जालना** विधानसभा मतदारसंघातील विजयी आमदार अर्जुन खोतकर यांच्या निवडणुकीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपी येथे फेटाळण्यात आली. न्यायमूर्ती किशोर संत यांनी हा निर्णय दिला.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे खोतकर यांनी काँग्रेसचे कैलास गोरंट्याल यांचा पराभव केला होता. यानंतर गोरंट्याल यांनी खोतकर यांच्या निवडणुकीविरोधात याचिका दाखल केली होती. याचिकेत असा दावा करण्यात आला होता की, खोतकर हे जालना बाजार समितीचे मुख्य प्रशासक म्हणून लाभाचे पद धारण करत होते. त्यामुळे ते निवडणूक लढवण्यास अपात्र ठरतात. तसेच त्यांच्या उमेदवारी अर्जासोबत सादर केलेले शपथपत्र विहित नमुन्यात नसल्याचा आणि निवडणूक प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप करण्यात आला होता.

दरम्यान, खोतकर यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेतील आदेश ७ नियम ११ अंतर्गत अर्ज करत याचिका प्राथमिक टप्प्यावरच फेटाळण्याची मागणी केली होती.

## माहिती तंत्रज्ञानविषयक नियमांमध्ये सुधारणा करण्याचा सरकारचा प्रस्ताव

■ नवी दिल्ली

**समाज**माध्यमांवरील आशयावरील आणि विशेषतः बातम्या आणि ताज्या घडामोडींवर प्रसारित केल्या जाणाऱ्या आशयावर अंकुश ठेवण्यासाठी माहिती तंत्रज्ञानविषयक नियम-२०२१ मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारच्या विचाराधीन आहे.

या प्रस्तावावर माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने सर्व संबंधितांकडून हरकती आणि सूचना मागवल्या आहेत. १४ एप्रिल २०२६ पर्यंत हरकती आणि सूचना पाठवाव्यात, असे आवाहन मंत्रालयाच्या वतीने करण्यात आले आहे. नोंदणीकृत प्रकाशक नसलेल्या व्यक्तिकडून समाजमाध्यमांवर प्रसारित केल्या जाणाऱ्या बातम्या आणि चालू घडामोडींबाबत माहिती तंत्रज्ञान नियमांमधील भाग-३ मध्ये नमूद नियमांमध्ये अधिक स्पष्टता आणून असा आशय प्रसारित करणाऱ्या वापरकर्त्यांची जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. या सुधारणांमुळे बातम्या आणि चालू घडामोडींवर भाष्य करणारा आशय प्रसारित करणारे वापरकर्ते डिजिटल मीडियाला लागू होणाऱ्या नियमांच्या चौकटीत समाविष्ट होणार आहेत.

## शिंदे गटाच्या अमोल खताळांच्या आमदारकीवर टांगती तलवार

### खटल्याला हिरवा कंदील

■ मुंबई

**शिंदे गटाचे** संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ यांना उच्च न्यायालयाने मोठा दणका दिला आहे. निवडणूक प्रतिज्ञापत्रात चुकीची माहिती दिल्याप्रकरणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी दाखल केलेली याचिका फेटाळण्याची खताळ यांची मागणी मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने फेटाळून लावली आहे. आता या प्रकरणी रीतसर खटला चालवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.



संगमनेर विधानसभा मतदारसंघातून अमोल खताळ यांच्या निवडीला बाळासाहेब थोरात यांनी आव्हान दिले आहे. खताळ यांनी आपल्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात उत्पन्नाचे स्त्रोत आणि कराच्या थकबाकीबाबत खरी माहिती लपवल्याचा आरोप थोरात यांनी मुंबई विद्यापीठात याचिका दाखल करून केला आहे. खताळ यांनी ही याचिका सुरुवातीलाच फेटाळून लावण्यासाठी अर्ज केला होता. पण खताळ यांची ही याचिका न्यायालयाने फेटाळली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाचे न्यायमूर्ती किशोर संत यांच्यासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. आता या प्रकरणाची पुढची सुनावणी ७ मे रोजी होणार आहे. अमोल खताळ नीलकमल नावाच्या फर्ममध्ये भागीदार आहेत. जीएसटी विभागाच्या वेबसाईटनुसार ही फर्म सक्रिय आहे.

## महाराणी ताराराणी जैन समाजाच्या आचार्य पद्मसागरांचे वादग्रस्त वक्तव्य

■ मुंबई

**शिवरायांच्या** सूनबाई आणि राजाराम महाराजांच्या पत्नी ताराराणी या जैन समाजाच्या होत्या, असे वक्तव्य जैन आचार्य नयन पद्मसागर यांनी केल्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. महावीर जयंतीनिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

आचार्य नयन पद्मसागर म्हणाले की, मोहम्मद घोरी यांनी भारतावर आक्रमण केले तेव्हा मेवाडमधील जैन राणीने तलवार उचलून प्रतिकार केला. त्यानंतर अनेक वर्षे देशाकडे वाईट नजरेने पाहण्याची कुणाची हिंमत झाली नाही. संस्कार आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी हातात तलवार घेणे, हेच खरे धर्माचे लक्षण आहे. तसेच विक्रमादित्य यांनी संपूर्ण भारताला स्वतंत्र करण्यात मोलाची भूमिका बजावली. औरंगजेब याने संभाजी महाराजांना पकडून अतोनात हाल केले. त्यावेळी आणखी एक जैन महाराणीचा जन्म झाला आणि ती म्हणजे ताराराणी. त्यांनी युद्धाची सूत्रे हाती घेत औरंगजेबाला पराभवाची धूळ चारली. हा इतिहास जैन स्त्रियांच्या पराक्रमाचा आहे. भारताचा इतिहास हा कधीच भित्र्यांचा नव्हता आणि कधीच असणार नाही. पद्मसागर यांच्या या विधानावर इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी तीव्र आक्षेप घेतला.

## बीकेसीच्या स्वच्छतेसाठी यांत्रिकी झाडू वर्षाला अडीच कोटी खर्च करणार

■ मुंबई-

**बीकेसी** अर्थात वांद्रे-कुर्ला संकुलातील २१.६० किमी रस्त्यांच्या स्वच्छतेसाठी मुंबई महापालिका वर्षाला सरासरी अडीच कोटी रुपये खर्चून यांत्रिक झाडूने सफाई करणार आहे. तीन वर्षांच्या कंत्राटासाठी एकूण सुमारे ७ कोटी २२ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. मात्र या प्रस्तावावर जोरदार चर्चा होण्याची शक्यता आहे.

बीकेसी परिसरात गेल्या १० वर्षांपासून यांत्रिक झाडूद्वारे रस्त्यांची सफाई केली जात आहे. आता नव्याने या यांत्रिक झाडूच्या कामांसाठी तीन वर्षांकरता कंत्राटदाराची निवड केली आहे. या २१.६९ किलोमीटर लांबीच्या या सर्व रस्त्यांच्या यांत्रिक सफाईसाठी वर्षाला सरासरी अडीच कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. तीन वर्षांकरता एकण ७ कोटी २२ लाख रुपयांचे कंत्राट लक्ष्य एंटरप्रायझेस या कंपनीला दिले आहे.हा परिसर एमएमआरडीएच्या ताब्यात असून, त्या भागाची स्वच्छता संबंधित प्राधिकरणाने करायला हवी, पण त्यांची काळजी महापालिकेलाच अधिक असल्याचे दिसून येत आहे. हे ठिकाण मुंबईतील आंतरराष्ट्रीय व्यापाराचे केंद्र म्हणून विकसित केले आहे.


## जैशचा प्रमुख मसूद अझहरच्या भावाचा पाकिस्तानात गूढ मृत्यू

■ कराची

**पाकिस्तानमध्ये** जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अझहर याचा भाऊ मोहम्मद ताहिर अन्वर याचा गूढ परिस्थितीत मृत्यू झाला आहे. त्याच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. ताहिर अन्वर हा जैश-ए-मोहम्मद या संघटनेशी जवळून संबंधित होता आणि अनेक वर्षे संघटनेच्या कारवायांमध्ये सक्रिय होता. त्याच्या मृत्यूची माहिती संघटनेच्या अधिकृत माध्यमातून देण्यात आली असून, त्याचा अंत्यसंस्कार बहावलपूर येथील जामिया मशीद उस्मान वली येथे होणार असल्याचे काल उशिरा रात्री सांगण्यात आले.

त्याच्या मृत्यूमागील कारणाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. आजारपण किंवा कोणत्याही विशिष्ट घटनेचा उल्लेखही करण्यात आलेला नसल्यामुळे या प्रकरणाबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.जैश-ए-मोहम्मद ही अतिरेकी संघटनेचा भारतातील अनेक मोठ्या दहशतवादी हल्ल्यांशी तिचा संबंध जोडला गेला आहे.

## नंदुरबारमध्ये बारावी पास बोगस डॉक्टरचा पर्दाफाश



■ नंदुरबार


**नंदुरबार** जिल्ह्यातील धडगाव तालुक्यात एका बोगस डॉक्टरचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कोणतीही वैद्यकीय पदवी किंवा अधिकृत परवाना नसतानाही हा व्यक्ती उघडपणे रुग्णांवर उपचार करत असल्याचे समोर आले आहे.

विचित्र बाबू मंडल असे या बोगस डॉक्टरचे नाव असून, तो मूळचा पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील असल्याची माहिती आहे. सातपुडा पर्वतरांगांतील दुर्गम भागात, विशेषतः गुंडाचापाडा परिसरात, गेल्या अनेक वर्षांपासून तो दवाखाना चालवत होता.

बारावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या या व्यक्तीकडे कोणतीही वैद्यकीय पात्रता नसतानाही तो आदिवासी रुग्णांवर उपचार करत होता. यामुळे अनेकांच्या जीवाशी धोका निर्माण झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, कॅमेऱ्यासमोर त्याने स्वतःच कबुली दिली.

# नवाकाळ शब्दकोडे–१५६२



**आडवे शब्द –**

१. वडिलांची बहीण, सासूचे नाते जोडले गेल्यावर वापरले जाणारे संबोधन ४. गोपनीय गोष्ट जाहीर करणे ६. आसूड ८. फूल ११. शिवीगाळ १३. रात्र १५. देवांचे स्वर्गातले पेय १७. समाधान १८. वरणफळे १९. अधोगती २०. उकळून घट्ट केलेले २१. नटवा २२. युद्धभूमी २५. मदिरा २६. पदवी २८. न्यारा, नमुनेदार ३१. अनियंत्रित जमाव ३२. पायऱ्या असलेली विहीर ३५. शत्रू ३६. रस्ता बांधताना वापरली जाणारी ३७. त्रिदोषांपैकी सर्वात महत्त्वाचा ३९. सिंह ४१. मार्गातील अडचणी ४४. हेळसांड, दुर्लक्ष ४५. मर्कट ४७. पत्त्यांचा एक खेळ ४८. नजरेत भरेल असे ५१. अंधार ५२. इच्छा ५३. परीट ५७. पक्षीराज, विष्णूचे वाहन ५९. निर्णय ६०. लालूच ६२. वाईट चालीची ६४. पुरुषांचे नेत्रांजन ६६. दुर्वा ६८. सुळका, बाह्यरेषा ६९. अधःपात झालेला ७१. प्रथा, परंपरा ७४. आश्रय ७६. दळलेले धान्याचे ७८. नव्याने कविता लिहू लागलेला ८१. गणपती ८४. पुरुरव्याची पत्नी, अप्सरा ८६. सज्ज, कबूल ८७. लहान घोडा ८८. खात्री ८८अ. फेकून देण्याजोग्या गोष्टी ८९. संसदसदस्य ९१. द्वितीय ९२. नीरा देणारे झाड ९३. गायब ९५. तांदळाच्या कण्यांची पेज ९७. ढीग ९९. तेलपाणी न मिळालेल्या दाराचा आवाज १०१. किंचित अंश १०३. काम, हेतू १०४. नवरदेवाची बहीण १०७. 'अति शहाणा त्याचा ×× ×××' १०८. पाणी भरण्याची सार्वजनिक जागा

**उभे शब्द –**

२. 'देव तारी ×× ×× ××' ३. धरणी, भूमाता ४. सुग्रीवाचा भाऊ ५. सारासार विवेक ६. लहान खार ७. परीक्षा ८. देव ९. सिंहासन, सत्ता १०. दलदल १२. पुठ्ठ्याची पेटी १४. लोक १६. धन, वित्त १७. गोड (आवाज) १८. खंदक २०. आरंभीचा २३. चढउतार दर्शवणारा तक्ता २४. कुंपण २५. मातीचे भांडे २७. अननुभवी २९. कोकणातील वसाहत ३०. सामूहिक व्यायाम ३२. लहान, किडकिडीत ३३. घायाळ ३४. ताबडतोब ३५. विष्णूलोक ३८. अस्वस्थता ४०. कागदावर लिहिताना डाव्या बाजूला रिकामी सोडलेली जागा ४२. उसाचा रस काढण्याचे पारंपरिक साधन ४३. खरबरीत ४६. व्याघ्रगर्जना ४९. सर्व ५०. रक्तवाहिनी ५२. विहीर ५४. पाणी ५५. कष्टकरी ५६. नवऱ्याचा भाऊ ५८. चंदेरी ५९. अर्थहीन ६१. सहा तोंडांचा देव ६२. 'आंधळे दळते आणि ×× ×× ××' ६३. बिशाद ६४. पुत्र ६५. मस्तवालपणा ६७. जास्त किंमतीचे ७०. पेचप्रसंग ७२. अडचण ७३. कन्या ७५. भूपती ७७. अहंकार ७९. अवांतर, इतर ८०. आसक्तीरहीत ८२. सरदार सरोवर प्रकल्प या नदीवर आहे ८३. जुनाट विचारांचा ८४. पार्वती ८५. खाली डोके वर पाय असे योगासन ८६. शेवट, निकाल ८९. मातीचे पात्र ९०. वाट, मार्ग ९२. महिना ९४. लाकडी पळी ९५. आवेश ९६. अधीन ९७. लाल घेवडा ९८. वायर १००. कळवळ्याचा भाव १०१. जिव्हाळा १०२. लठ्ठ १०३. चुलता १०४. कडवट १०५. रंग १०६. गुरांना बांधायची जागा

•

**नवाकाळ कोडे क्रमांक १५६१ चे उत्तर**

**आडवे शब्द** : ४. किमया ६. नाकबूल ८. आसवे ११. त्याला देव देणार १२. रसना १५. माळ १६. कोप १८. अपराधी २०. बंड २२. आळ २३. श्यामभटाची तट्टाणी २५. आडमाप २७. संमती २८. वर्जित २९. शिबंदी ३३. घसा ३४. मन ३६. इंच ३७. आटपाटनगर ४०. यथा ४१. ईद ४३. रोष ४४. कमाई ४६. टाच ४७. गाथा ४८. सरवा ५१. कळक ५३. तर्क ५४. गोरा ५५. कुंभमेळा ५६. अननुभवी ५८. पालथा ६०. खाज ६१. आगाशी ६२. काटक ६४. वाढ ६६. रोग ६७. सावध ६८. समजूत ६९. डाकीण ७१. बडवा ७३. हजर ७४. खालसा ७५. डेरा ७८. निवारा ७९. गौरी ८०. टप ८२. बरकत ८४. मठ्ठ ८६. कच्छ ८७. गार ८९. कवळी ९१. आदिपुरुष ९२. परवाना ९३. लोणी ९४. जतन ९६. खिल्लार ९७. खच ९८. न्यून ९९. दीन १००. राजगिरा १०१. वाटप

**उभे शब्द** : १. हत्यारबंद शिपाई २. संदेह ३. स्वदेश ४. किरकोळ ५. यार ६. नाना ७. बूट ९. समाधी १०. वेळ १३. सहमती १४. दुपट्टा १७. कटाक्ष १८. अतर्क्य १९. राणीवसा २१. हूड २२. आप २३. श्यामची आई २४. दंतकथा २५. आदिम २६. माशी ३०. मंचक ३१. फुपाटा ३२. पेन ३३. घर ३५. नरो वा कुंजरो वा ३८. टच ३९. गहाळ ४०. यथातथा ४२. दसरा ४५. मागे ४९. उमेद ५०. खुनशी ५१. कवी ५२. कपाट ५४. गोडवा ५६. अगाध ५७. भरमसाट ५९. लकडा ६१. आवर ६२. कातडे ६३. तृण ६५. ढब ६७. साजरा ६८. सल ७०. कीटक ७२. डळमळीत ७३. हवालदिल ७४. खारीक ७६. राब ७७. बटीक ८१. पगार ८३. रट्टा ८३अ. तत्क्षणी ८५. दारूबाज ८८. रवानगी ९०. वजन ९२. परत ९३. लोचट ९५. नदी ९६. खिरा ९७. खवा

## सावरकर की मार्लन ब्रँडो? धीरज देशमुख शर्टमुळे ट्रोल

पान १ वरून

यांच्या शर्टवर कुणाचा फोटो आहे? असा प्रश्न विचारत अनेकांनी कमेंट्स केल्या. काहींनी तर उपरोधिक टिप्पणी करत काँग्रेस समर्थक सांगा, हा माणूस विरोधी पक्षाच्या कार्यक्रमाला कशासाठी गेला होता?अशा आशयाचे प्रश्न उपस्थित केले.

या चर्चेला वेगळे वळण देत एका वापरकर्त्याने स्पष्ट केले की, शर्टवरील फोटो हा स्वातंत्र्यवीर सावरकरांचा नसून हॉलिवूडमधील दिग्गज अभिनेते मार्लन ब्रँडो यांचा आहे. मार्लन ब्रँडो हे दोन वेळा ऑस्कर पुरस्कार विजेते आणि अमेरिकन चित्रपटसृष्टीतील अत्यंत प्रभावशाली अभिनेते व दिग्दर्शक म्हणून ओळखले जातात. त्यांचे २००४ साली निधन झाले. या सर्व प्रकारामुळे एका बाजूला वाढदिवसाचा शाही सोहळा चर्चेत राहिला, तर दुसऱ्या बाजूला धीरज देशमुख यांच्या शर्टवरील प्रिंटमुळे राजकीय टोलेबाजीला उधाण आले.

## छत्रपती संभाजीनगरात आठवडी बाजार बंदच्या निर्णयाला विरोध

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती संभाजीनगरात** आठवडी बाजार बंद करण्याच्या निर्णयाला भाजपा आमदार संजय केणेकर यांनी विरोध दर्शवला आहे. सामान्य नागरिक, कष्टकरी व लहान विक्रेत्यांवर याचा परिणाम होणार असल्याने हा निर्णय तातडीने स्थगित करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. या संदर्भात संजय केणेकर यांनी महापौर, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि महापालिका आयुक्त यांना निवेदन देत आपली भूमिका स्पष्ट केली. याबाबत संजय केणेकर म्हणाले की, सर्वसामान्य माणूस आठवडी बाजारातूनच स्वस्त दरात माल खरेदी करतो.

## ज्ञानेश्वर महाराज पालखीचे पुण्यातील मुक्कामाचे स्थान बदलण्यावरून वाद

पान ८ वरून

समित्यांचे प्रतिनिधी, विश्वस्त, समाजातील नामवंत आणि नियमित वारी करणारे विठ्ठल भक्त या बैठकीला उपस्थित होते.

ज्ञानेश्वर महाराजांचा पुण्यातील पारंपरिक मुक्काम विठ्ठल मंदिर परिसरात आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुणे महानगरपालिकेने १० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. असे असताना आळंदी देवस्थान ट्रस्ट पालखीच्या मुक्कामाचे स्थळ विठ्ठल मंदिराऐवजी एसपी कॉलेजच्या मैदानात हलवण्याच्या विचारात आहे. आळंदी देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त लवकरच या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत.

विठ्ठल मंदिर ट्रस्टच्या विश्वस्तांनी या निर्णयाला विरोध केला असून, आपल्याला विचारात घेतल्याशिवाय अंतिम निर्णय घेतला जाऊ नये, अशी मागणी केली आहे. आळंदी देवस्थान ट्रस्ट १३ एप्रिल रोजी ज्ञानेश्वर पालखी सोहळ्याची रुपरेषा आणि पालखीचा मार्ग याबाबत अधिकृत घोषणा करणे अपेक्षित आहे.

## सुनेत्रा पवारांनी बारामतीला प्रदूषण मंडळ मुख्यालय हलवले

पान १ वरून

मुंडे यांच्याकडे केली आहे. ते म्हणाले, हा निर्णय घेण्यापूर्वी स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेण्याची गरज होती. हरकती व सूचना मागवणेही आवश्यक होते, पण कुणालाही कल्पना न देता हे कार्यालय स्थलांतरित केले. त्यामुळे आता पुण्यातील नागरिकांना बारामतीला जाण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरला नाही. गंभीर बाब म्हणजे मंत्री मुंडे यांना व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनाही या निर्णयाची माहिती देण्यात आली नव्हती.

भाजपा आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनीही या प्रकरणी मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे तक्रार केली आहे. एमआयडीसीच्या भोर, जेजुरी, सासवड, बारामती, इंदापूर, दौंड या तालुक्यांसह मालेगाव नगरपंचायतीच्या क्षेत्रात औद्योगिक वसाहती आहेत. या परिसरात तब्बल ५१ तर ७२ लहान-मोठे उद्योग आहेत. कुरकुंभ, बारामती, जेजुरी व इंदापूर या ४ एमआयडीसीच्या औद्योगिक वसाहती, कात्रज हडपसर, रामटेकडी पर्वती व कोथरूड औद्योगिक वसाहत, पुणे महापालिकेच्या पाच क्षेत्रांतील औद्योगिक वसाहती आहे. या ठिकाणी कोणताही प्रश्न निर्माण झाला तर तो सोडवण्यासाठी आता बारामतीला यावे लागणार आहे.

## नीलम गोऱ्हे काळ्या हृदयाची व खोटारडी बाई!

पान १ वरून

खाली आणलेली विधानसभा कोणी पाहिली नव्हती. २० जून २०२२ रोजी सभागृहाने ते पाहिले आणि मग एकेक उड्या पडत गेल्या. त्या उड्यांमध्ये या बाईंची उडी होती. त्या म्हणायच्या आम्हाला उद्धव ठाकरे भेटत नव्हते. परंतु, मी जेव्हा मुख्यमंत्री बंगला किंवा मातोश्रीवर जायचे तेव्हा ही बाई आम्हाला थांबवायची आणि म्हणायची की, थांबा, उद्धवजी जरा व्यग्र आहेत. जर उद्धवजी भेटत नव्हते, तर तुला कसे कळले की ते व्यस्त आहेत? मी कार्यकर्ती म्हणून सांगते ही बाई एक नंबरची खोटारडी आहे. बुद्धी आणि चातुर्य आहे, पण ते तिने फक्त स्वतःसाठी वापरले. पक्षासाठी त्याचा काहीच उपयोग झाला नाही. श्रमदानही तिने कधी केले नाही.

किशोरी पेडणेकर आणखी म्हणाल्या की, मी एकदा त्यांच्या गाडीत होते. एका पोलिसाने फक्त उठून सलाम केला नाही, त्याचे लक्ष नव्हते. त्या सरळ केबिनमध्ये गेल्या, फोन लावला, त्याला वर बोलावले, त्याच्या वरिष्ठालाही बोलावले आणि त्याला बोलल्या. तेव्हा मला जाणवले की, यांचा अहंकार खूप मोठा आहे. यांना मान-सन्मान हवा होता आणि जेव्हा कळले की, आता हे उद्धवजींकडून मिळत नाही, कदाचित मिळणार नाही, तेव्हा उडी एकनाथ शिंदेकडे घेतली. आता मग लोकांना प्रश्न पडतो की उंदीर कोण आणि मांजर कोण? साक्ष कोण कोणाची काढते? या बाईवर बोलावे तेवढे कमीच आहे. आता सामोरी जा. तुझे पुरावे बाहेर येत आहेत आणि ते दाखवले जात आहेत. कॅप्टननी तुम्हाला चांगली कॅप्टनशिप दिली. आता तुम्ही कॅप्टनकडे जाऊन काय काय केले, ते कॅप्टनच सांगेल. आम्हाला काही माहिती नाही.

पेडणेकर म्हणाल्या की, मुळात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री निरोप समारंभाच्या वेळी जे करतात, त्याला जर तुम्ही स्वतःचे क्रेडिट मानत असाल, तर त्यावरूनच कळते किती अज्ञान आहे. मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी सर्वांसाठी केले, तुमच्यासाठीही केले. आम्हाला पोटदुखीचा प्रश्न नाही. तुमचेच पोट एवढे आहे की ते भरत नाही. त्यामुळे पोटदुखीचा प्रश्नच येत नाही.

## भोंदू खरातचा सीएही रडारवर पत्नीच्या नावे १८ रो-हाऊस



■ पुणे

**भोंदू**बाबा अशोक खरात याच्याशी संबंधित आर्थिक व्यवहारांची चौकशी पोलिसांनी वेगाने सुरू केली आहे. या प्रकरणात अशोक खरातचा चार्टर्ड अकाउंटंट (सीए) प्रकाश पोफळे याच्याशी संबंधित मोठ्या मालमत्ता व्यवहारावर संशय व्यक्त केला जात आहे. पुण्यातील उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या कोरेगाव पार्क परिसरात सुमारे ४९ गुंठे जागेवर तब्बल १८ रो-हाऊस पोफळे यांच्या पत्नीच्या नावावर असल्याचे उघड झाले आहे. या मालमत्तेची अंदाजे किंमत १५० कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याची चर्चा आहे. या मालमत्तेची खरेदी कागदोपत्री २०२४ साली केवळ १९ कोटी रुपयांना केल्याचे दाखवण्यात आल्याचे समोर आले आहे. बाजारभाव आणि दाखवलेल्या किमतीतील मोठी तफावत लक्षात घेता हा व्यवहार संशयास्पद मानला जात आहे. त्यामुळे या व्यवहारामागे आर्थिक गैरव्यवहार किंवा काळ्या पैशांचा वापर झाला असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### भोंदू खरातच्या भावाने शालार्थचे आरोप फेटाळले

भोंदूबाबा अशोक खरात याचा भाऊ दिलीप खरात यांनी बनावट शालार्थ आयडी मिळवल्याचे त्यांच्यावर झालेले आरोप फेटाळून लावले आहेत. दिलीप खरात यांनी म्हटले आहे की, माझा अशोक खरातशी काहीही संपर्क नव्हता. माझ्या शालार्थ आयडी प्रक्रियेत अशोक खरातचा काडीचाही हस्तक्षेप नाही.

मी २००९ पासून एका शिक्षण संस्थेत इमानदारीने कार्यरत आहे. आमच्या शालेय संस्थेला टप्प्याटप्प्याने २०२५ पर्यंत ६० टक्के अनुदान मिळाले आहे. दिलीप खरात यांनी म्हटले आहे की, सरकारी नियमांनुसार ज्या संस्थांना २० टक्के अनुदान मिळते, त्यांना वेतनासाठी शालार्थ आयडी अनिवार्य असतो. माझ्या संस्थेला अनुदान मिळाल्यानंतरच कायदेशीर प्रक्रियेतून मला शालार्थ आयडी प्राप्त झाला आहे. यामध्ये कोणत्याही राजकीय दबावाचा किंवा गैरप्रकाराचा संबंध नाही. अनुदान मिळावे यासाठी २००९ पासून आंदोलन केले आहे. १२ वर्षांनंतर २० टक्के अनुदान शाळेला सुरू झाले होते.

## केंद्रीय मंत्री रामदास आठवलेंनी कार्यकर्त्यांना खडे बोल सुनावले

पान ८ वरून

उत्तर देताना रामदास आठवले बोलत होते. यावेळी पुज्य बौध्द धम्म गुरू डॉ. राहुलबोधी महाथेरो यांचा अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मी राज्यात कॅबिनेट मंत्री होतो. त्यानंतर मी तीनवेळा लोकसभेत निवडून आलो. आता राज्यसभेत तीनवेळा निवडून आलो आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या मंत्रिमंडळात मी तीनवेळा राज्यमंत्री झालो आहे. मी कुणाकडे मागायला गेलो नाही, राजकारणात मागून मिळत नाही. माझ्या पाठीशी गोरगरीब जनता, झोपडीवासी, दलित, बहुजन, आदिवासी सर्व महाराष्ट्राने मला ताकद दिली म्हणून मी दिल्लीचे तख्त गाठू शकलो. राज्यात एकही असे गांव नसेल जिथे माझा संपर्क झालेला नाही. संपूर्ण देशात मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष पोहोचवला आहे. मला एकट्याला सत्ता नको, माझ्या सहकाऱ्यानाही सत्तेत सहभाग दिला पाहिजे. मात्र माझ्या सहकाऱ्यांना सत्तेत सहभाग मिळत नाही. आपण तळागाळातील जनतेशी संपर्क ठेवून त्यांचे प्रश्न सोडवले पाहिजे. सतत लोकांचा पाठिंबा आपल्याला मिळत राहिला पाहिजे. तसे होत नाही. त्यामुळे कदाचित राज्यात माझ्या सहकाऱ्यांना सत्तेत सहभाग मिळत नसेल. मुंबईत आणि राज्यात पक्षाची प्रचंड ताकद आहे. ती जागृत केली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. मी कधीच मित्रपक्षाच्या चिन्हांवर निवडणूक लढलो नाही. आपल्या पक्षांवर आपण प्रेम केले पाहिजे. गन्ना किसान हे आपल्या पक्षाला निवडणूक चिन्ह मिळाले आहे. आपल्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक जिंकता आली पाहिजे. त्यासाठी नियोजन करून पक्षबांधणी करा, असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले.

*माझ्या भिमामुळे माझ्या कामाला येत आहे आकार,*
*म्हणून चेंबुरमध्ये होत आहे माझा सत्कार*
*माझ्या आयुष्यात मी कधी मानली नाही हार*
*कारण मी दुश्मनांवर करीत आलो वार*
*सर्वांसाठी माझे उघडे असते दार*
*कारण देशभरात जागी केली दलित नार*
*अशी कविता रामदास आठवले यांनी सादर केली.*

## वडिलांशी वादातून अमानुष कृत्य

पान ८ वरून - असलेल्या लोखंडी अँगलवरती आपटले. नंतर त्याला रिक्षातून पायाला धरून जोरात खेचले आणि त्याचा पाय पकडून जोरात हवेत भिरकावत डोक्यावर आपटले. एवढ्यावरच न थांबता संदीपने त्याला पायाला धरून फरफटत नेले आणि पहिल्या मजल्यावरील शिडीवर नेऊनही मारहाण केली. विघ्नेशची आजी त्याला सोडवण्यासाठी गेली असता तिलाही या नराधमाने मारहाण केली. सोसायटीच्या सीसीटीव्हीत हे दृश्य कैद झाले आहे. आरोपी संदीप पवार याच्यावर वसई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला अटक करण्यात आली आहे. आरोपी पवार याच्या मुलाच्या वडिलांशी असलेल्या वादातून त्याने ही मारहाण केल्याची माहिती वसई पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण घाडीगावकर यांनी दिली.

## इराणमध्ये भारतात येणाऱ्या विमानावर अमेरिकेचा हल्ला

पान ८ वरून

मानवतावादी संबंधांचा हा भाग होता. मात्र, या हल्ल्यामुळे नियोजित मदत मोहिमेला मोठा फटका बसला आहे. अमेरिकेने मात्र या हल्ल्याबाबत कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

इराणच्या नागरी विमान वाहतूक संघटनेने या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. हे विमान केवळ नागरी सेवा देत नसून विविध देशांतून आणलेली जीवनरक्षक औषधे वाहून नेणार होते. अशा प्रकारे नागरी विमानाला लक्ष्य करणे हा आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण नियमांचा भंग आहे, असे इराणने म्हटले आहे. याबाबत 'शिकागो करार (१९४४)' आणि माटियल करार (१९७१) या जागतिक कायदेशीर चौकटींचा हवाला दिला आहे. या करारानुसार, नागरी विमानांना धोका निर्माण करणे हा आंतरराष्ट्रीय गुन्हा ठरतो. तसेच जिनिव्हा कराराच्या कलम ५२ नुसार, मानवतावादी मदत नेणाऱ्या नागरी वस्तूवर हल्ला करणे हा 'युद्धगुन्हा' मानला जातो.

**TENDER NOTICE**

Sealed Item Rate Tenders are invited from Reputed & Experienced CONTRACTORS for Structural Restorations, Civil Repairs, Waterproofing & Painting works of

**FACTORY BUILDING OF LALJEE GODHOO & CO.**

PLOT NO. 53/4 ROAD, 7/15, M. I. D. C. ANDHERI (EAST), MUMBAI- 400093

Tender Documents can be obtained from Factory Office Only:
Mr. Satish Warkar - 7718099224
Cost of Tender :
Rs. 5,000/- Cash Only (non-refundable)
Tender Forms will be available from 01/04/2026 to 07/04/2026 between 11:00 am to 01:00 pm Only on Working Days.

**PMC**
**M/s. RUSHABH SURENDRA KARNAVAT**

Company & PMC reserves all the rights to cancel the tender or to cancel any scope of work in the tender or to reject - all the tenders or the lowest tender or any other tender without assigning any reason to anyone at any point of time.

Date of Tender Submission: 07/04/2026 TILL 04:00 PM at Factory Office

**मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड**

निविदा करिता विनंती- MRVC/W/144

(एक पाकिट ई- प्रोक्योरमेंट निविदा प्रक्रिया)

मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लि. ज्यांचे कॉर्पोरेट कार्यालय दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन इमारत, मुंबई-४०००२० येथे आहे, यांचे द्वारे **"एमयूटीपी-III अंतर्गत विरार - डहाणू विभागादरम्यान हाय-मास्टची खरेदी (वॉरंटी कालावधी दरम्यान डिझाइन, उत्पादन, पुरवठा, एकाधिक लोडिंग/अनलोडिंग, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वयन)."** ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदाचे तपशील आणि निविदा दस्तावेज ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट https://www.eprocure.gov.in/eprocure/app वर उपलब्ध आहेत। पूर्ण भरलेली ई-निविदा वेबसाईट https://www.eprocure.gov.in/eprocure/app वर जमा करण्याची शेवटची तारीख **05.05.2026** रोजी दु. **15.00** वा. पर्यंत आहे. **शुद्धीपत्र, जर असेल, तर ते फक्त वैबसाईट वर प्रसिद्ध करण्यात येईल।**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की , माझ्या अशिलांनी खालील लिखित परिशिष्टामधील वा विशेषत: वर्णन केलेली जमिन मिळकत ही श्री. विजय रघुनाथ कडुलकर, श्री. मोहन विलास कडुलकर व श्री. अभिजित विजय कडुलकर यांच्याकडुन विकसित करण्याकरीता घेण्याचे ठरविले आहे.

तरी, सदरहू मिळकत वा त्याचा कोणताही भाग याचे संदर्भात कोणाही व्यक्तीचा, अथवा संस्थेचा अथवा बँकेचा अथवा कंपनीचा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा हितसंबंध,लाभ, मागणी,विक्री,आदलाबदल, गहाण, दान, बोजा, तारण, बक्षीस, साठेकरार, खरेदीखत, कुलमुखत्यारपत्र भाडेपट्टा, भार,धारणाधिकार,वारसा,भोगवटा,कब्जा,कुटुंब व्यवस्था,तडजोड, कोणत्याही कायद्याच्या न्यायलयाचा हुकुम वा आदेश , या अगर इतर स्वरुपात हक्क व अधिकार असतील, तर त्या व्यक्ती, बँक, संस्था, कंपनी यांनी आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आमचे कार्यालयात नोंदवावी, कसुर केल्यास कोणत्याही स्वरुपाचा असा हक्क, अधिकार अथवा हितसंबध, लाभ, मागणी सोडुन दिली आणि /वा त्यागित केली आहे असे मानले जाईल आणि असा दावा अस्तित्वात नसल्याचे मानले जाईल व माझे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील.

**वरील संदर्भीय परिशिष्ट:**

पोटतुकडी व तुकडी ठाणे, तालुका व जिल्हा ठाणे, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मे. सह/दुय्यम निबंधक ठाणे यांचे स्थळ सिमेतील, मौजे ठाणे शहर, नौपाडा येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत:

| (सि.टी.एस) नगर भुमापन क्रं | (टीका) शिट क्रं. | क्षेत्र चौ.मी. |
| --- | --- | --- |
| ९०/अ | १५ | १३२५.१७ |


**श्री.प्रदिप एस.पाटील** (वकिल हायकोर्ट,)
पत्ता : ४०२, ४ था मजला, बी विंग, श्रीनाथ प्लाझा को.ओ.हौ.सो., दत्त मंदिर जवळ, धोबी आळी, चरई , ठाणे (प.)४०० ६०१
मोबाईल नं. ९८२१०९३८९३.

**बऱ्याच दिवसांनी एक सकस, अर्थपूर्ण प्रवास सांगणारे पुस्तक वाचायला मिळाले. चित्रा पालेकरांचे आत्मचरित्र तर.. अशी सारी गंमत. आयुष्यात बरेच काही घडून गेल्यावर मागे वळून पाहताना सहजपणे तो इतिहास सांगत जावे.. तसे. आपले इप्सित गाठण्याची धडपड,त्या प्रवासात आलेले अनुभव,कठीण प्रसंगी मिळालेली सुहृदांची साथ, भेटलेल्या नामांकित व्यक्ती, निर्माण झालेले गैरसमज दूर झाल्यावर लाभलेली निरपेक्ष, निर्मळ मैत्री, काही प्रसंगी भोगावे लागलेले मनःस्ताप, त्यातून उठून उभे राहण्यासाठी घातलेली स्वतःचीच समजूत....हे असे सगळे सांगताना चित्रा पालेकरांचा स्वर कधी कर्कश होत नाही की त्या आक्रस्ताळ्या होत नाहीत. विलक्षण संयमाने मोजक्या शब्दात त्या व्यक्त होत जातात.**

## तर अशी सारी गंमत

**चित्रा** पालेकरांनी आपले ७५ वर्षांचे आयुष्य चार टप्प्यात मांडलेय. त्यांचा जन्म सुसंस्कृत सुशिक्षित घरातला. बालपण मोकळ्या कौटुंबिक वातावरणात गेले. महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या सेंट झेवियरमध्ये झाले. टेबलटेनिस खेळणारी, गणितीय अर्थशास्त्र घेऊन पदवीधर झालेली ही तरुणी नाटकाकडे वळते.

तिथे सत्यदेव दुबेंच्या संपर्कात आल्यावर अभिनय हा तिचा छंद न राहता तिच्या अस्तित्वाचा भागच बनत जातो. त्याच दरम्यान सुपरस्टार अमोल पालेकरांशी विवाह होतो. त्या काळात कुटुंब, शिक्षण, नाटक आणि नोकरी सांभाळत जगताना करावी लागणारी कसरत त्या संयमी भाषेत सांगतात. त्या काळातील कलाकारांची मानसिकताही त्या बारकाईने नोंदवतात. तो प्रकार मनोरंजक असाच. बनगरवाडी, कैरी, आक्रीत या चित्रपटांच्या निर्मितीतील प्रसंग फारच रोचक उतरलेत. त्यांनी ऐनवेळी अंगावर पडलेल्या जबाबदाऱ्या पेलताना दाखवलेले धाडस थक्क करते. त्यांच्या या आत्मकथनात १९७० ते २०१० पर्यंतचा चित्रपट सृष्टीचा कालपट आणि




चित्राबाईनी स्वतःत घडवून आणलेले सकारात्मक बदल यांचे दर्शन घडते. निवेदनाची भाषाशैली विलक्षण प्रभावी, ओघवती तशीच नर्मविनोदी आहे. रंजक प्रसंग सांगतानाची त्यांची रंजक शैली आपल्या घटस्फोटाविषयी सांगताना अल्पाक्षरी होते. संयम राखून विषय संपवते. कटुता जिरवून, ती पुसून टाकून नव्या जोमाने उभे राहताना त्यांचा खंबीरपणा लक्षात येतो.

वेळोवेळी मदत करणाऱ्या सहकाऱ्यांचे त्या कृतज्ञतापूर्वक स्मरण करतात. कुचाळकी ,कुचेष्टा न करता,माझंच ते खरं, या अट्टाहासाच्या आहारी न जाता व्यक्त होतात. एका सुशिक्षित आणि तितक्याच सुसंस्कृत स्त्रीने सिनेक्षेत्रात, अभिनयात, दिग्दर्शनात, निर्मितीत आपले नाव

**वीणा गवाणकर**

जागतिक पटलावर कोरले हे अभिनंदनीय. त्यांनी आपल्या लेकीचे समलिंगी असणे मायेनं, बुद्धीनं स्वीकारलं आणि त्यासाठी जाहीरपणे भूमिकाही घेतली. इथेही त्यांचे ठाम असणे थोडक्या शब्दात त्या सांगतात. या आत्मचरित्राचे प्रा. प्रभा गणोरकर यांनी केलेले बांधीव, नीटस संपादन हा या पुस्तकाचा विशेष. असे वाचनीय आणि तितकेच मननीय आत्मचरित्र मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले.

## राष्ट्रवादीच्या रचनेत मोठे बदल? ओबीसी-अल्पसंख्याक सेल वगळले

■ मुंबई

**राष्ट्रवादी** अजित पवार गटाच्या रचनेत मोठे बदल करण्यात आल्याचा आरोप होत आहे. ओबीसी, अल्पसंख्याक आणि सामाजिक न्याय विभाग त्यात वगळण्यात आल्याचा दावा शरद पवार गटाकडून करण्यात आला आहे.

शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आरोप केला की, नव्या रचनेत पक्षाचा कणा मानले जाणारे अल्पसंख्याक, ओबीसी आणि सामाजिक न्याय विभाग काढून टाकण्यात आले आहेत. याआधी एकत्रित राष्ट्रवादीच्या रचनेत एकूण सात विभाग होते. मात्र, नव्या रचनेत केवळ युवक, विद्यार्थी, महिला आणि सेवादल या चारच विभागांचा समावेश आहे. पक्ष विभाजनानंतर अजित पवार यांनी काही प्रमाणात आपली स्वतंत्र विचारसरणी जपण्याचा प्रयत्न केला होता. मात्र आता हा बदल करून भाजपाच्या विचारधारेकडे झुकण्याचा प्रयत्न सुरू आहे अशी टीका होत आहे. हे सर्व आरोप अजित पवार गटाने फेटाळले आहेत. अजित पवार गटाचे नेते सुरज चव्हाण म्हणाले की, रोहित पवार आमच्या पक्षात फूट पाडण्यासाठी आमच्या नेत्यांना बदनाम करण्यासाठी एका एजन्सीला ५ कोटी रुपये दिले आहेत.

## वृद्ध आई-वडिलांची काळजी न घेणाऱ्यांचा पगार कापणार

■ हैदराबाद

**तेलंगणा** सरकारने वृद्ध आई-वडिलांची काळजी न घेणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारातून १०-१५ टक्के रक्कम कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. ही कापलेली रक्कम थेट पालकांच्या खात्यात जमा केली जाईल. हा कायदा आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर केला जाणार आहे, असे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी जाहीर केले.



हे विधेयक तेलंगणा विधानसभेत मंजूर करताना मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी श्रावणकुमारची कथा सांगितली. रेड्डी म्हणाले की, तो आपल्या आई-वडिलांप्रती असलेल्या भक्तीसाठी ओळखला जात होता आणि त्यांची सेवा करताना मारला गेला. लोकांनी आपल्या आई-वडिलांची सेवा करण्यासाठी श्रावणकुमारला प्रेरणा मानले, तर आपल्याला कोणत्याही कायद्यांची गरज भासणार नाही. समाजात मानवी नातेसंबंध कमकुवत होत आहेत. लोकांनी भक्तीभावाने आपल्या आई-वडिलांची सेवा केली पाहिजे. तसे न करणाऱ्या आपण लोकांच्या मनात भीती निर्माण केली पाहिजे. म्हणूनच आम्ही हे विधेयक आणले आहे. हा कायदा तेलंगणामध्ये कार्यरत असलेल्या सर्व सरकारी

**तेलंगणा सरकारचा निर्णय**

आणि खाजगी संस्थांमधील कर्मचाऱ्यांना, राज्य सरकारकडून पगार घेणाऱ्या प्रत्येकाला, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निर्वाचित व नामनिर्देशित सदस्यांना, तसेच आमदार आणि विधान परिषद सदस्यांना लागू होतो. एक किंवा दोन्ही पालक, कायद्यानुसार नियुक्त अधिकारी असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांकडे, आपल्या मुलाच्या मासिक पगारातील काही भागाची मागणी करणारा लेखी अर्ज सादर करू शकतात. आपल्याला सन्मानाने जगण्यासाठी त्यांच्याकडे उत्पन्नाचा पुरेसा स्त्रोत नाही आणि त्यांना आपल्या मुलाच्या आर्थिक मदतीची गरज आहे, हे त्यांना सिद्ध करावे लागेल.




## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना खडे बोल सुनावले

■ मुंबई

**रिपब्लिकन** पक्षाची देशभर घोडदौड सुरू आहे. नागालँन्ड सारख्या राज्यात रिपब्लिकन पक्षाचे २ आमदार निवडून आले आहे. मणिपुरमध्ये पक्षाला १७ टक्के मतदान मिळून पक्ष मान्यता प्राप्त झाला आहे. मुंबईत मात्र रिपाइंच्या उमेदवारांना मतदान मिळत नाही. अनेक वॉर्डात आपला पाठिंबा नसला तरी मित्र पक्षाचे उमेदवार निवडून येतात. एकेकाळी मुंबईत रिपब्लिकन पक्षाचे १२ नगरसेवक निवडून आले होते. मुंबईचे महापौरपद ही रिपब्लिकन पक्षाला मिळाले होते. आता मुंबईतल्या कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन पक्ष कुठे आणून ठेवलाय याचे आत्मपरिक्षण करावे, अशा शब्दांत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मुंबईतील पदाधिकारी कार्यकर्त्यांना खडे बोल सुनावले. ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी चार पावले मागे येऊन तरुण पिढीला संधी दिली पाहिजे. दलित पँथरसारखी तरुणांची फौज उभी केली पाहिजे. युती झाली नाही तरी स्वबळावर उमेदवार निवडून आणता आले पाहिजे. केवळ बौध्दांच्या मतांवर उमेदवार निवडून येणार नाहीत. सर्व समाजाला सोबत घेवून मुंबईत रिपब्लिकन पक्षाची मजबूत पुर्नबांधणी करा, असे आवाहन रामदास आठवलेंनी रिपब्लिकन कार्यकर्त्यांना केले. चेंबूर येथील फाईन आर्ट सभागृहात रिपब्लिकन पक्षाच्या दक्षिण मध्य मुंबई जिल्ह्याच्या वतीने जिल्हाध्यक्ष संजय डोळसे यांच्या पुढाकारातून केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी सत्काराला

पान ७ वर




## द्रौपदी मुर्मू १६ एप्रिलला वर्धा दौऱ्यावर

■ वर्धा

**भारताच्या** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या १६ एप्रिल रोजी वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार



आहेत. या दौऱ्याच्या निमित्ताने महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय येथे होणाऱ्या सहाव्या दीक्षांत समारंभाला त्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## अँटेलिया प्रकरणी सचिन वाझेचा थेट सहभाग होता

**मुंबई** - उद्योगपती मुकेश अंबानी यांचे मुंबईतील निवासस्थान अँटेलिया येथे बॉम्ब ठेवलेली गाडी उभी करून धमकावल्या प्रकरणी तसेच व्यावसायिक मनसुख हिरेन हत्या प्रकरणी आरोपी असलेला बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांच्या दोषमुक्त करण्याच्या

**एनआयएचा दावा**

याचिकेला राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) न्यायालयात विरोध केला. या दोन्ही प्रकरणांमध्ये वाझेचा थेट सहभाग होता, असा दावा एनआयएने केला. या प्रकरणीच्या खटल्यात वाझे याने आपल्याला दोषमुक्त करण्याची मागणी याचिकेद्वारे केली आहे. या याचिकेवरील सुनावणी प्रसंगी एनआयएच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, वाझेने दोषमुक्त करण्यासाठी केलेली याचिका म्हणजे न्यायालयाचा वेळ वाया घालवण्याचा प्रयत्न आहे. त्याचा या दोन्ही प्रकरणांत थेट सहभाग होता, याचे ठोस पुरावे आपण न्यायालयात सादर केले आहेत.

## इराणमध्ये भारतात येणाऱ्या विमानावर अमेरिकेचा हल्ला

■ तेहरान

**इराणमधील** मशहद विमानतळावर भारताकडे उड्डाण करण्याच्या तयारीत असलेल्या एका नागरी विमानावर अमेरिकेने हवाई हल्ला केला.या हल्ल्यात हे विमान नष्ट झाले आहे. इराणच्या 'महान एअर' या कंपनीचे हे विमान वैद्यकीय मदत आणि औषधे वाहून नेण्यासाठी एका मानवतावादी मोहिमेचा भाग म्हणून नवी दिल्लीला येणार होते, इराणने या घटनेला आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन आणि 'युद्धगुन्हा' म्हटले आहे.

हे विमान मशहद आंतरराष्ट्रीय विमानतळावर उभे असताना हा हल्ला झाला. भारत आणि इराण यांच्यातील द्विपक्षीय समन्वयांतर्गत औषधे आणि वैद्यकीय साहित्याची वाहतूक करण्यासाठी या विमानाचा वापर केला जाणार होता. भारताने इराणला मदत सुरू केली असून, उभय देशांतील

पान ७ वर

## स्थानिक विमानतळांचा अट्टाहास सरकार तफावत निधी द्यावा लागतो

■ मुंबई

**केंद्र** सरकारने स्थानिक दळणवळण सुधारायचे म्हणून स्थानिक पातळीवर 'उडान'अंतर्गत विमानतळे सुरू करण्याची योजना केली. मात्र ही योजना अयशस्वी ठरते आहे. कारण तितके प्रवासी मिळत नाहीत. प्रवासी नसतानाही विमानतळ सुरू ठेवायचे तर त्याची देखभाल करायला हवी. त्यासाठी आता राज्य सरकारांवर बोजा टाकून त्यांच्याकडून तोटा भरून घेण्यासाठी तफावत निधी भरणे आवश्यक केले आहे. याच योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळ ते मुंबईपर्यंतच्या हवाई सेवेसाठी विमान परिचालक कंपनीला ७ कोटी ६४ लाख रुपयांचा व्यवहार्यता तफावत निधी (व्हिजीएफ) देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. चिपी-मुंबई विमान सेवा मेसर्स जस्ट उडो एव्हिएशन प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी चालवते. राज्य सरकारच्या निर्णयानुसार या कंपनीला प्रति आसन २ हजार ९९१ रुपये याप्रमाणे एकूण ७ कोटी ६४ लाख २० हजार ५० रुपये तफावत निधी मिळणार आहे.

## भोंदू खरातची पत्नी कल्पना फरार मुलगा हर्षवर्धन पोलिसांच्या ताब्यात

■ नाशिक

**भोंदूबाबा** अशोक खरात प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई करत त्याच्या कुटुंबियांवरही कडक कारवाईचा बडगा उगारला. शिर्डी येथील जमीन खरेदी व्यवहारातील फसवणुकीच्या प्रकरणात अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना आणि इतर तिघांविरोधात गुन्हा दाखल केला. या प्रकरणी अशोक खरातचा मुलगा हर्षवर्धनला पोलिसांनी त्याच्या नाशिकमधील घरातून ताब्यात घेतले. मात्र कल्पना खरात फरार असल्याने पोलिसांना तिला पकडता आले नाही.

भोंदूबाबा अशोक खरात, त्याची पत्नी व इतर तिघे अशा एकूण ५ जणांविरुद्ध शिर्डीत चार एकर भूखंड खरेदी व्यवहाराच्या नावाखाली शेतकरी रावसाहेब गोंदकर यांची कोट्यवधींची फसवणूक प्रकरणी सावकारी कायद्यानुसार शिर्डी पोलीस ठाण्यात आज गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी दोघांना अटक केल्याची माहिती श्रीरामपूर विभागाचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी दिली. दोघांना न्यायालयाने ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. त्यानंतर पोलिसांनी नाशिकमध्ये अशोक खरातच्या घरी छापा टाकला. या कारवाईदरम्यान पोलिसांनी त्याचा मुलगा हर्षवर्धन खरातला ताब्यात घेतले. चौकशीत त्याच्याकडून जमीन व्यवहार, आर्थिक देवाणघेवाण व इतर संबंधित बाबींबाबत महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता आहे.

## भाईंदर रेल्वे स्थानकात ट्रेन पकडताना तरुणाचा मृत्यू

**मुंबई** - भाईंदर रेल्वे स्थानकावर आज सकाळी एक दुर्दैवी अपघात घडला. कामावर निघालेल्या एका तरुणाचा लोकलखाली चिरडून मृत्यू झाला. सकाळच्या गर्दीच्या वेळी घडलेल्या या घटनेमुळे काही काळ स्थानक परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. संबंधित तरुण प्लॅटफॉर्म क्रमांक १ वरून लोकल पकडण्याचा प्रयत्न करत होता. यावेळी त्याचा तोल जाऊन तो थेट रेल्वे रुळावर पडला. त्याचवेळी समोरून येणाऱ्या लोकलने त्याला धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. सकाळच्या गर्दीच्या वेळेत मीरा-भाईंदर परिसरातून मोठ्या संख्येने नोकरदार मुंबईकडे प्रवास करत असतात. याचवेळी ही दुर्घटना घडल्याने प्लॅटफॉर्म क्रमांक १ वरील रेल्वेसेवा काही काळ विस्कळीत झाली. मात्र, मृतदेह बाहेर काढल्यानंतर रेल्वेसेवा पुन्हा सुरळीत करण्यात आली. रेल्वे पोलिसांनी सांगितले की, प्रवाशांची प्रचंड गर्दी आणि गोंधळाच्या परिस्थितीत हा अपघात झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## वडिलांशी वादातून अमानुष कृत्य चिमुकल्या मुलाला उचलून आपटले

■ वसई

**मुलगा अत्यवस्थ**

**वडिलांशी** असलेल्या पूर्ववैमनस्यातून एका रिक्षाचालकाने ४ वर्षांच्या चिमुकल्या मुलाला उचलून जमिनीवर आपटल्याची घटना वसईत घडली आहे. वडिलांशी असलेल्या वादाचा राग रिक्षाचालकाने मुलावर काढला. या मारहाणीत मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर मिरा रोड येथील रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. वसई पोलिसांनी आरोपी रिक्षा चालकाला अटक केली आहे. मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटनेबद्दल सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

वसई कोर्टाजवळ असलेल्या अनुपम घर संकुल या इमारतीमध्ये अतुल कोंढारे पत्नी आणि मुलासह राहतात. त्यांना विघ्नेश हा साडेतीन वर्षांचा मुलगा आहे. काल संध्याकाळी आठच्या सुमारास विघ्नेश सोसायटीच्या आवारात अन्य लहान मुलांसह खेळत होता. खेळता खेळता तो आवारात उभ्या असलेल्या एका रिक्षात जाऊन बसला. ते पाहून रिक्षाचालक संदीप पवार तिथे आला. त्याने विघ्नेशला पकडून त्याचे डोके रिक्षाच्या मीटरच्या बाजूला

पान ७ वर

## आ.विजय शिवतारेंना मुलीने किडनी दिली



■ पुरंदर

**शिंदे** गटाचे पुरंदर-हवेलीचे आमदार विजय शिवतारे यांना त्यांच्या कन्या डॉ. ममता शिवतारे यांनी किडनी दान करून नवजीवन दिले आहे. वडिलांना पुन्हा एकदा नव्या उमेदीने जीवन जगण्याची संधी त्यांच्या लेकीने दिल्याने राज्यभर या घटनेची चर्चा रंगली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून विजय शिवतारे यांना किडनीचा गंभीर आजार होता आणि किडनी निकामी झाल्यामुळे ते डायलिसिसवर उपचार घेत होते. प्रकृतीत सातत्याने बिघाड होत असताना कुटुंबियांवर चिंतेचे सावट होते. अशा कठीण प्रसंगी त्यांच्या लेकीने पुढाकार घेत वडिलांना किडनी दान करण्याचा निर्णय घेतला. मुंबई येथे किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली असून, दोघांचीही प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

## मुंबईत आजपासून वीजदरात कपात! ग्राहकांना मोठा दिलासा

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार उद्या म्हणजेच १ एप्रिल २०२६ पासून मुंबईतील वीजदरात कपात करण्यात येणार आहे.

नवीन आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी बेस्ट, अदानी इलेक्ट्रिसिटी आणि टाटा पॉवर या तिन्ही वीज वितरण कंपन्यांच्या दरात घट होणार असून, मे महिन्याच्या बिलात ग्राहकांना याचा थेट फायदा दिसून येईल. दर कपातीचा सर्वाधिक फायदा विविध वापर गटांतील ग्राहकांना होणार आहे. टाटा पॉवरच्या दरात अल्प वापर (०-१०० युनिट) गटासाठी सुमारे ९.७ टक्के, मध्यम वापर (१०१-३०० युनिट) गटासाठी सुमारे १०.८ टक्के, तर जास्त वापर (३०१-५०० युनिट) गटासाठी



तब्बल १४ टक्क्यांपर्यंत कपात करण्यात आली आहे. अदानी इलेक्ट्रिसिटीच्या स्मार्ट मीटरधारक ग्राहकांसाठीही विशेष सवलत जाहीर करण्यात आली आहे.

## ज्ञानेश्वर महाराज पालखीचे पुण्यातील मुक्कामाचे स्थान बदलण्यावरून वाद



**संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीच्या पुण्यातील मुक्कामाचे पारंपरिक स्थान हलवण्याच्या आळंदी देवस्थानच्या प्रस्तावाला विठ्ठल मंदिर देवस्थानचे विश्वस्त, स्थानिक नेते आणि रहिवाशांनी विरोध केला आहे.**

■ पुणे

**सुमारे** साडेतीनशे वर्षे चालत आलेल्या परंपरेनुसार ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा पुण्यातील मुक्काम भवानी पेठेतील विठ्ठल मंदिरात असतो. मात्र विठ्ठल मंदिरात जागा अपुरी असल्यामुळे यंदा पालखीचा मुक्काम अन्यत्र हलवण्याचा विचार सुरू आहे.

पंढरपूरच्या आषाढी वारीचा एक भाग असलेल्या ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा यंदा ८ जुलैपासून सुरू होत आहे. त्यापूर्वी वारीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी नुकतीच पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात सर्व संबंधितांची एक बैठक संपन्न झाली. अनेक

पान ७ वर

## इराणच्या इस्फहानवर अमेरिकेने २ हजार किलोचा बॉम्ब टाकला

■ तेहरान

**इराणच्या** लष्कराचा महत्त्वाचा तळ आणि अण्वस्त्रांचा मोठा साठा असलेल्या इस्फहान शहरावर अमेरिकेने दोन हजार किलो वजनाचा बंकर बस्टर बॉम्ब टाकल्याचा दावा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. ट्रम्प यांनी या हल्ल्याचा एक व्हिडिओ ट्रुथ सोशलवर शेअर केला आहे. मात्र हा व्हिडिओ नक्की इस्फहान शहरातीलच आहे, याचा ठोस पुरावा व्हिडिओमध्ये दिसत नाही. ट्रम्प यांनी शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये रात्रीच्या काळोखात एका पाठोपाठ एक बॉम्बस्फोट आणि आगीचे लोळ उठताना दिसत आहेत. अमेरिकेच्या सरकारी अधिकाऱ्यांनी काही वेळानंतर हा व्हिडिओ इस्फहान शहरातील असल्याच्या ट्रम्प यांच्या दाव्याला दुजोरा दिला. इस्फहान शहरात इराणचा अण्वस्त्र साठा असून, या साठ्यावर बंकर बस्टर बॉम्ब टाकल्याने तेथील अण्वस्त्रांचा स्फोट झाला, असा दावाही अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी केला.

## झिरवाळ व्हायरल व्हिडिओ प्रकरणी तृतीयपंथीय व्यक्तीच्या भावावर गुन्हा

■ मुंबई

**मंत्री** नरहरी झिरवाळ यांच्याशी संबंधित कथित व्हायरल व्हिडिओ प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणी तृतीयपंथीय व्यक्तीच्या तक्रारीवरून कफ परेड पोलीस ठाण्यात तिच्याच सख्ख्या भावाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काही दिवसांपूर्वी मंत्री नरहरी झिरवाळ आणि एका तृतीयपंथीय व्यक्तीचा कथित व्हिडिओ व्हायरल झाला होता. या व्हिडिओमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. व्हायरल झालेला व्हिडिओ मूळ स्वरूपात नसून, दोन-तीन वेगवेगळे व्हिडिओ जोडून तयार

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

करण्यात आल्याचा दावा मंत्री नरहरी झिरवाळ यांनीही केला आहे. संबंधित तृतीयपंथीय व्यक्तीने पोलिसांकडे धाव घेत आपल्या सख्ख्या भावावर आरोप केले आहेत.